रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक १०२ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि.१८ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹

## निराधार दिव्यांगांना मिळणार २५०० रुपये

**रायगड :** इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तिवेतन योजनांमधील सर्व दिव्यांग लाभार्थींना आता दरमहा १५०० रुपयांऐवजी २५०० रुपये मिळणार आहेत. राज्यातील दिव्यांग कल्याण संघटना, लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्याकडील दिव्यांग लाभार्थींच्या लाभात एक हजार रुपयाने वाढ केली आहे. काही वर्षांपूर्वी हा लाभ एक हजार रुपयांपर्यंतच होता, त्यात ५०० रुपयांची वाढ करण्यात आली होती. मात्र, तेवढ्या तुटपुंज्या रकमेत ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्यांचा उदरनिर्वाह भागत नव्हता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अनुदान वाढीचा निर्णय घेत त्यांना दिलासा दिला आहे. या वाढीव अनुदानासाठी दिव्यांग लाभार्थीच पात्र असणार आहेत.

## शालार्थ आयडीसाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ

**रायगड :** राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडीबाबतची कागदपत्रे सादर करण्यास शिक्षण विभागाने दुसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता २० सप्टेंबरपर्यंत कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत खासगी शाळांतील ८३ टक्के शिक्षक, कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर केली आहेत. बोगस शालार्थ आयडीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीबाबत नवी कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यात शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतांची २०१२ ते २०२५ या काळातील कागदपत्रे शालार्थ संकेतस्थळावर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पान २ वर

# आता ईव्हीएमवर उमेदवारांचे फोटो

## निवडणूक आयोगाने घेतला निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**गेल्या काही दिवसांपासून देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणूक तसेच या निवडणुकांत केंद्रीय निवडणूक आयोगाची भूमिका हा विषय केंद्रस्थानी आहे. निवडणुकीत मतचोरी झाल्याचा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे . बिहारमध्ये काँग्रेसने आयोजित केलेल्या व्होट अधिकार यात्रेत याच मुद्द्याला केंद्रस्थानी ठेवून भाजपा, निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात आले. असे असतानाच आता एकीकडे विरोधकांकडून अनेक आरोप होत असताना, केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. आयोगाने इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनवर उमेदवारांचे रंगीत फोटो लावण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने ईव्हीएमबाबत एक नवी गाईडलाईन जारी केली आहे. या नव्या नियमांची अंमलबजावणी बिहारच्या विधानसभा निवडणुकीत होणार आहे. या नव्या गाईडलाईन्सनुसार आता ईव्हीएमवर उमेदवारांचे पहिल्यांदाच रंगीत फोटो लावले जाणार आहेत. सोबतच ईव्हीएम वरील अनुक्रमांकही आता आणखी स्पष्ट दिसतील अशी त्यांची रचना केली जाणार आहे.

एकरूपता सुनिश्चित करण्यासाठी सर्व उमेदवार, नोटा नावं एकाच फॉन्ट प्रकार आणि सहज वाचता येईल अशा पुरेशा मोठ्या फॉन्टच्या आकारात छापली जातील. तसेच ईव्हीएम मतपत्रिका ७० जीएसएम कागदावर छापली जातील. विधानसभा निवडणुकीसाठी, आरजीबी मानांकन असणाऱ्या गुलाबी रंगाच्या कागदाचा उपयोग केला जाईल. एकूणच, आगामी निवडणुकांमध्ये प्रगत मतपत्रिकेचा वापर केला जाईल, ज्याची सुरुवात बिहार विधानसभा निवडणुकीपासून होणार आहे.

बिहारमध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार उमेदवारांच्या रंगीत छायाचित्राचा प्रयोग करण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्रात आगामी निवडणुकांमध्ये उमेदवारांची छायाचित्रे ईव्हीएम मशीनवर पाहावयास मिळणार असल्याची शक्यता आहे.

### विरोधक काय भूमिका घेणार?

**निवडणूक आयोगाच्या या नव्या गाईडलाईन्सची अंमलबजावणी लवकरच होऊ घातलेल्या बिहारच्या विधानसभा निवडणुकीत केली जाणार आहे. निवडणूक प्रक्रिया अधिक स्पष्ट व्हावी तसेच मतदारांना मतदान करताना सर्व उमेदवारांचे फोटो स्पष्टपणे दिसावेत यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता विरोधक या निर्णयावर नेमकी काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.**

**निवडणूक आयोगाने जारी केलेल्या पत्रकानुसार भारतीय निवडणूक आयोगाने निवडणूक नियमावली १९६१ च्या नियम ४९ ब अंतर्गत असलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये संशोधन केले आहे. या संशोधनानुसार आता ईव्हीएमवर निवडणुकीला उभे राहिलेल्या उमेदवारांचे रंगीत फोटो छापले जातील. तसेच फोटोच्या तीन चतुर्थांश भागावर उमेदवाराचा चेहरा असेल. उमेदवार कोणता आहे हे स्पष्टपणे समजावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच उमेदवारांचा अनुक्रमांक हा आंतरराष्ट्रीय भारतीय अंकांत असेल. या अंकाच्या फॉन्टचा आकार ३० असेल. हे सर्व अंक बोल्ड फॉन्टमध्ये असतील.**

### तीन टप्प्यांत निवडणुकांमुळे राज्यात

# दोन-तीन महिने आचारसंहिता?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ईव्हीएम मशीनच्या कमतरतेमुळे राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून विचारविनिमय सुरू आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आणखी दोन ते अडीच लाख ईव्हीएम यंत्रे उपलब्ध झाल्यास निवडणूक व आचारसंहितेचा कालावधी कमी करता येणे शक्य होणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतर कोणत्याही कारणासाठी मुदतवाढ मिळणार नाही, असे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने बजावले आहे. त्यामुळे आता कोणतीही हयगय न करता सर्व निवडणुका तातडीने पार पाडण्यासाठी आयोगाने प्रक्रिया सुरू केली आहे. आतापर्यंत जिल्हा परिषदांची प्रभागरचना पूर्ण झाली आहे आणि अध्यक्षपदांची आरक्षणेही जाहीर झाली आहेत. त्यामुळे अंतिम मतदारयादी जाहीर केल्यावर निवडणुका घेण्यात कोणतीही अडचण नाही.

आयोगापुढे सध्या मुख्य प्रश्न ईव्हीएम यंत्रांच्या उपलब्धततेचा आहे. आयोगाकडे केवळ ६५ हजार ईव्हीएम यंत्रे उपलब्ध असल्याचे सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सांगण्यात आले. राज्यात निवडणुकीसाठी ९० हजारांहून अधिक मतदान केंद्रे (बूथ) उभारली जातात. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुंबईसह अन्य ठिकाणी मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी झाल्याने विधानसभा निवडणुकीत पान २ वर

## वेधक

### भुजबळांच्या अडचणीत वाढ

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्यासमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या तक्रारीनंतर भुजबळांच्या मालकीच्या बेनामी संपत्तीची चौकशी होणार आहे. विशेष सत्र न्यायालयाने तसे आदेश दिले आहेत. या आधी ही चौकशी तांत्रिक कारणामुळे थांबवण्यात आली होती. ती आता पुन्हा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आपल्या जीवावर राजकारणी स्वतःचे खिसे भरतात, मात्र आपल्याला न्याय मिळत नाही. आता भुजबळांची चौकशी सुरू झाल्यानंतर तरी देवेंद्र फडणवीस हे त्यांची पान २ वर


### मान्सून परतीच्या प्रवासाला, पण पावसाचा धुमाकूळ कायम

# विजांसह पावसाची शक्यता

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी रविवारपासून पश्चिम राजस्थानमधून परतीच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. तर, मंगळवारपासून मान्सूनने राजस्थानच्या आणखी काही भागासह गुजरात, पंजाब आणि हरियाणाच्या काही भागांतून माघार घेतली आहे. मात्र, परतीच्या प्रवासाला लागल्यानंतरही महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ वाढला आहे. कोकण, विदर्भात पावसाचा मुक्काम सोमवारपर्यंत वाढला आहे.

भारतीय हवामान विभागाने नैऋत्य मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. सर्वसाधारणपणे १७ सप्टेंबरला सुरू होणारी ही प्रक्रिया यंदा तीन दिवस आधी, म्हणजेच १४ सप्टेंबरला पश्चिम राजस्थानमधून सुरू झाली आहे. मात्र, दुसरीकडे विदर्भावर असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि बंगालच्या उपसागरात तयार होणाऱ्या नवीन प्रणालींमुळे मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असला तरी, महाराष्ट्रातून तो इतक्यात माघार घेणार नसून, आगामी आठवडाभर राज्यात पावसाचा मुक्काम कायम राहणार आहे. मान्सूनच्या परतीची वाटचाल सुरू असतानाच गेल्या आठवड्यापासून राज्यात मुसळधार पाऊस हजेरी लावत आहे. राज्यात विजांसह जोरदार पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, बीड जिल्ह्यांत जोरदार पावसाचा अंदाज दिला आहे. तर, उर्वरित राज्यात मात्र हलक्या पावसाची शक्यता आहे. पान २ वर



# घंटागाडी कामगारांना सुट्ट्यांचा मोबदला!

**। पनवेल । वार्ताहर ।**

- **पगारी सुट्टीत काम करणाऱ्यांना मिळणार पैसे**
- **१४ महिन्यांची थकीत रक्कम ठेकेदार अदा करणार**

पनवेल महानगरपालिकेमध्ये कचरा संकलन करणारे घंटागाडी नियमानुसार २१ सुट्ट्या मिळणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना त्याचा मोबदला देणे नियमानुसार बंधनकारक आहे. परंतु, २०२३ चे २०२४ या कालावधीमध्ये काम करूनही संबंधितांना पैसे मिळाले नव्हते. यासंदर्भात आझाद कामगार संघटनेने पाठपुरावा करून उपोषणाचा इशारा दिला. त्यानुसार महापालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला आदेश दिले आहेत. लवकरच घंटागाडी विषय स्वच्छतादूतांच्या खात्यामध्ये ही रक्कम जमा होणार आहे.

पनवेल महापालिका क्षेत्र ११० किमीचे आहे. या ठिकाणी घनकचरा संकलित करून तो डम्पिंग ग्राऊंडवर नेण्याचे कामघंटागाडी कामगार करतात. पान २ वर



### प्रत्येकी २०००० थकबाकी मिळणार!

**पगारी रजा असतानाही त्या दिवशी कामावर आलेल्या घंटागाडी कामगारांना आता संबंधित ठेकेदाराकडून काम केलेल्या दिवसांचे पैसे मिळणार आहेत.१४ महिन्यांचा विचार करता पगारी सुट्टीचे जवळपास २० हजार रुपये थकीत कामगारांना मिळणार आहेत.**

> **घंटागाडी कामगारांना अतिशय परिश्रम घ्यावे लागतात. कचरा संकलन करून तो डम्पिंग ग्राऊंडवर येण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असते. नियमानुसार त्यांना पगारी सुट्ट्या देणे आवश्यक आहे. परंतु मध्यंतरीच्या काळामध्ये काही कामगारांना सुट्ट्या मिळाल्या नाहीत. त्या बदल्यात त्यांना पैसे द्यावेत, अशी आम्ही मागणी केली होती. ही महापालिकेने मान्य करून त्याप्रमाणे आदेशसुद्धा दिले आहेत. लवकरच कामगारांना चप्पल आणि गणवेश मिळणार आहेत. आझाद कामगार संघटनेच्या पाठपुराव्याला यश मिळाले याचे समाधान आहे.**
> **– महादेव वाघमारे, अध्यक्ष, आझाद कामगार संघटना**

### पेज नदीत आढळला मृतदेह

**नेरळ :** कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या पेज नदीच्या पात्रात कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या टाकवे येथील पुलाच्या बाजूला एक मृतदेह आढळून आला. कर्जत पोलीस त्या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर कर्जत तालुक्यातील टाकवे गावाच्या हद्दीत पेज नदीत एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. स्थानिक गुराखी यांच्याकडून माहिती मिळाल्यानंतर कर्जत पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी त्या मृतदेहाची ओळख पटवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मंगळवारी दुपारच्या सुमारास गुरे चारायला गेलेल्या एका स्थानिक व्यक्तीला नदीत झुडपामध्ये एक मृतदेह असल्याचे आढळून आले. घटनेची माहिती पोलिसांना पान २ वर

## माणगावात व्हॉट्सअ‍ॅपद्वारे मटका जुगार सुरू

### सहा आरोपींवर गुन्हा दाखल

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत निजामपूर शहरात व्हॉट्सअ‍ॅपद्वारे सुरू असलेल्या मटका जुगार रॅकेटवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई केली आहे. निजामपूर बसस्थानकाजवळील विमल निवास इमारतीच्या जिन्याखाली सुरू असलेला हा जुगार उघडकीस आला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकून प्रकाश पांडुरंग पाकड याला जुगाराच्या आकडेमोडीसह रंगेहाथ पकडले. त्याचा मोबाईल जप्त करून पंचनामा करण्यात आला आहे. मोबाईलची तपासणी केल्यावर व्हॉट्सअ‍ॅपवर PakhadDo/No, Praksha Np Konkan, FINAL KHABAR, PAKHD KO/MO अशा नावाचे ग्रुप आढळून आले. या ग्रुपमधून कल्याण नावाचा मटका जुगाराचे आकडे प्रसारित करून स्वतःच्या फायद्यासाठी जुगार खेळवला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

याप्रकरणी प्रकाश पांडुरंग पाकड याच्यासह प्रकाश पांडुरंग सावंत, रा. निजामपुर, राजेश कांतिलाल छेडा, रा. माणगाव, संदीप शहाजी चव्हाण, रा. कुमशेत दहीवली, हितेन पान २ वर

## मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर रंगफेक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कजवळ बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी स्व. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली आहे. अज्ञातांनी या पुतळ्यावर लाल रंग फेकला, सकाळी ही गोष्ट शिवसैनिकांच्या निदर्शनास येताच इथं गर्दी जमली. पोलिसांनीही या प्रकाराची गंभीर दखल तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. याठिकाणी राज ठाकरेंनंतर आता उद्धव ठाकरे यांनीही पुतळ्याची पाहणी केली आहे. त्यावेळी महाराष्ट्र पेटवण्याचा कुणाचा तरी डाव दिसतोय, अशी शंका त्यांनी उपस्थित केली.

याबाबत उद्धव ठाकरे म्हणाले की, हा प्रकार निंदनीय आहे. ज्याला स्वत:च्या आईवडिलांची



लाज वाटते, अशा नराधमाने, बेवारस व्यक्तीने ही गोष्ट केली असावी किंवा बिहारमध्ये ज्या प्रकारे मोदींच्या आईचा अपमान झाला म्हणून बिहार बंद करण्याचा असफल प्रयत्न झाला, तसा महाराष्ट्र पेटवण्याचे काम कुणी करत असेल. आमच्या भावना तीव्र आहेत. आम्ही शिवसैनिकांना शांत राहण्याचं आवाहन केले आहे. पोलीस या घटनेतील आरोपीचा शोध घेत आहेत, असं त्यांनी सांगितले. तसेच या घटनेमागे कोण आहे याचा शोध घेतला पाहिजे. महाराष्ट्रात दंगल पेटवण्याचा काहींचा प्रयत्न असावा अशा लोकांनी हे केले असावे, अशी शंका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

दादरमध्ये घडलेल्या या घटनेनंतर शिवसैनिकांमध्ये आक्रोश आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत या भागात कार्यकर्त्यांची गर्दी आहे.

### २४ तासांत आरोपीला शोधा : राज ठाकरे

**दरम्यान, सकाळी या प्रकाराची माहिती मिळताच मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी भेट दिली. तिथे संबंधित पोलीस अधिकारी यांच्याशी राज यांनी संवाद साधला. त्यावेळी परिसरातील सगळे सीसीटीव्ही चेक करा, २४ तासांत या आरोपीला शोधून काढा अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.**

## ६६ वीजचोरांना महावितरणचा दणका

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

महावितरणच्या कल्याण ग्रामीण विभागात येणाऱ्या टिटवाळा, इंदिरा नगर, गणेश वाडी, बल्लाणी परिसरात अनधिकृतपणे तसेच सर्व्हीस वायरमध्ये छेडछाड करुन वीज वापर करणाऱ्या ६६ वीज चोरांना महावितरणने दणका दिला आहे. या वीजचोरांच्या विरोधात वीज कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या वीजचोरांनी ३०.७३ लाख रुपयांची वीजचोरी केली.

महावितरण कडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, कल्याण ग्रामीण विभागात येणाऱ्या बल्लाणी, इंदिरा नगर, गणेश वाडी, टिटवाळा परिसरात मोठ्या प्रमाणात वीजचोरी होत असल्याची माहिती मिळाली होती. याची खात्री करण्यासाठी टिटवाळा उपविभागाचे



उपकार्यकारी अभियंता गणेश पवार यांनी पथक तयार करून वीज मीटर तपासणी मोहीम हाती घेतली. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात या परिसरातील वीज ग्राहकांचे मीटर तपासण्यात आले. यावेळी वीजचोरी करणाऱ्या व्यक्ती वीज मीटर असून देखील वीज चोरी करीत असल्याचे आढळून आले तसेच, काहीजण सर्व्हीस वायरमध्ये छेडछाड करून अनधिकृतपणे वीज वापर करीत असल्याचे आढळून आले. अशा प्रकारे महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील मांडा ग्रामीण शाखा कार्यालय अंतर्गत ६६ ठिकाणी वीज पान २ वर

### सागरी महामंडळाने कसली कंबर | सागरी प्रवासाला नवा पर्याय

# मुंबई-कोकण रो-रो सेवेला दसऱ्याचा मुहूर्त!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**कोकणवासियांची प्रतीक्षा अखेर संपणार आहे. मुंबई ते कोकण यादरम्यान प्रवासी व वाहनांसाठीची रो-रो फेरीसेवा दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्याची तयारी सुरू असून, सागरी महामंडळाने कंबर कसली आहे.**

काही महिन्यांपासून केंद्र व राज्यस्तरीय परवानग्या, हवामान अडथळे आणि तांत्रिक कारणांमुळे ही सेवा वारंवार पुढे ढकलली जात होती. गणेशोत्सवात ही सेवा सुरू होईल, अशाप्रकारे नियोजन सुरू होते. मात्र, आता सर्व परवानग्या मिळाल्या असून, समुद्रस्थितीही अनुकूल होत आहे. त्यामुळे दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावरच उद्घाटनाचा सरकारचा मानस आहे. गणेशोत्सवात सेवा न मिळाल्याने नाराजी होती, पण नवरात्रोत्सवात ही पान २ वर




### प्रशासनाची जय्यत तयारी सुरू

**सागरी महामंडळाने बोटीची सेवा सुरुवात करण्यासाठी तांत्रिक व प्रशासनिक तयारी पूर्ण केली आहे. जेट्टीवर प्रवाशांसाठी बैठकीची सोय, वाहनांसाठी स्वतंत्र लोडिंग-विचार केंद्र, तसेच सुरक्षित उतार व चढाव यासाठी योग्य उपाययोजना केली जात आहे. जयगड आणि विजयदुर्ग येथे जेट्टीवरून शहरात जाण्यासाठी बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच हवामान अहवालावर नजर ठेवून समुद्रस्थिती अनुकूल असल्यास ताबडतोब सेवा सुरू करण्याचे प्रशासनाकडून नियोजन सुरू आहे.**

### प्रवाशांना दिलासा

**सणासुदीच्या काळात हजारो प्रवासी कोकणात आपल्या गावी जाण्यास निघतात. महामार्गावर तासन्तास होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका, रेल्वेत तिकिटासाठीची धावपळ यामुळे प्रवास नेहमीच त्रासदायक ठरत होता. रो-रो सेवेमुळे सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय मिळणार आहे.**

### सेवा कशी असेल?

**भाऊचा धक्का (मुंबई) येथून जयगड आणि विजयदुर्गपर्यंत या बोटी धावणार आहेत.**

**प्रवास वेळ : मुंबई - रत्नागिरी ३ ते ३.५ तास, मुंबई-सिंधुदुर्ग ५ तास**

**वेग : २५ नॉट्स दक्षिण आशियातील सर्वात वेगवान प्रवासी बोट.**

### तिकीट दर

| | |
|---|---|
| इकोनॉमी | २,५०० रु. |
| प्रीमियम इकोनॉमी | ४,००० रु. |
| बिझनेस | ७,५०० रु. |
| फर्स्ट क्लास | ९००० रु. |
| वाहनांचे दरचारचाकी | ६००० रु. |
| दुचाकी | १००० रु. |
| सायकल | ६०० रु. |
| मिनी बस | १३,००० रु.. |

# आता मराठ्यांचं वादळं दिल्लीत धडकणार

### जरांगे पाटलांनी केली घोषणा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या मुंबईतील आंदोलनाला मोठ यश आलं आहे. त्यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्यात सरकारने हैदराबाज गॅझेट लागू करण्यासंदर्भातील जीआर काढला आहे. हा मराठा समाजाचा मोठा विजय मानला जात आहे. राज्यात लवकरच सातारा गॅझेटदेखील लागू होण्याची शक्यता आहे.

याच दरम्यान आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मराठ्यांचं वादळ आता दिल्लीमध्ये धडकणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे ते दिल्लीमध्ये अधिवेशन घेणार आहेत. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या पान २ वर



## ओबीसी धडकणार मुंबईत

**कळमनुरी :** कळमनुरी येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वात ओबीसी समाजाने उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर तात्काळ रद्द करावा, ही या मोर्चाची प्रमुख मागणी आहे. यावेळी बोलताना लक्ष्मण हाके यांनी सरकारला थेट इशारा दिला. आमच्या अनेक पिढ्यांचं शोषण तुम्ही केलं. आता जीआर रद्द केला नाही तर दसऱ्यानंतर मुंबईला निघू. मुंबईतील एकही रस्ता रिकामा राहणार नाही, असे हाके म्हणाले. जर सरकारने जीआर रद्द केला नाही, तर मुंबईत दहा दिवस आंदोलन चालेल आणि महाराष्ट्र कोणाच्या बापाची जहागीर नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून

## शालार्थ आयडीसाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ

त्यात नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता, रुजू अहवाल, शालार्थ मान्यतेचे आदेश अशा कागदपत्रांचा समावेश होता. त्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र, राज्यभरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कागदपत्रांची जमवाजमव करण्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणून देत संघटनांनी मुदतवाढीची मागणी केली होती. त्यानुसार शिक्षण आयुक्तांनी १५ सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली होती. ही मुदत नुकतीच संपली. या पार्श्वभूमीवर शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी विभागीय मंडळ अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, वेतन आणि भविष्य निर्वाह निधी पथक अधीक्षक यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत. त्यात, सद्य:स्थितीत ८३ टक्के कामकाज डीडीओ-१ यांच्या स्तरावर पूर्ण झाले आहे. आता २० सप्टेंबरपर्यंत डीडीओ १ तथा मुख्याध्यापक यांच्या लॉग इनमधून कागदपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. कागदपत्रे सादर करण्यास विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी. शालार्थ प्रणालीमध्ये कागदपत्रे सादर करण्याच्या कामकाजाकडे विशेष लक्ष देण्यात यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## तीन टप्प्यांत निवडणुकांमुळे राज्यात दोन-तीन महिने आचारसंहिता

केंद्रांची संख्या वाढविण्यात आली होती. त्यामुळे प्रत्येक केंद्रासाठी किमान एक ईव्हीएम यंत्र गृहीत धरले, तरी लाखभर यंत्रे लागतील. त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून अन्य राज्यांमधील ईव्हीएम यंत्रेही मागविण्यात आली असून, ती नोव्हेंबरमध्ये उपलब्ध होणार आहेत. यंदा दिवाळी ऑक्टोबरमध्ये असून, त्यानंतर शाळा-महाविद्यालयांना एक-दोन आठवड्यांची सुट्टी असणार आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यांत नगरपालिकांच्या निवडणुका नोव्हेंबरमध्ये पार पाडल्या जाण्याची शक्यता आहे.

ईव्हीएम यंत्रांमध्ये नोंदली गेलेली मतेही निकाल जाहीर झाल्यावर काही दिवस सुरक्षित ठेवावी लागतात. त्यामुळे हा कायदेशीर कालावधी संपल्यावरच ही ईव्हीएम यंत्रे दुसऱ्या टप्प्यांसाठी वापरता येतील. त्यामुळे निवडणुकीचा दुसरा टप्पा डिसेंबरमध्ये आणि तिसरा जानेवारीत घ्यावा लागणार आहे. महापालिकांची निवडणूक सर्वात शेवटी पार पडण्याची शक्यता आहे. मात्र, तीन टप्प्यांत निवडणुका झाल्यास राज्यात आचारसंहिता दीर्घकाळ अंमलात राहणार आहे आणि राज्य सरकारला धोरणात्मक निर्णय कठीण होणार आहे. मात्र, तीन ते साडेतीन लाख ईव्हीएम यंत्रे केंद्रीय निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिल्यास हे टप्पे कमी करून कमीत कमी कालावधीत या निवडणुका घेता येतील का, या पर्यायांवर आयोगाकडून विचार सुरू आहे. एका निवडणूक निकालातील जय-पराजयाचा परिणाम अन्य निवडणुकांवर होऊ शकतो. त्यामुळे निवडणुकांचे टप्पे कमी झाल्यास ते राजकीय पक्षांना सोयीचे होईल आणि आचारसंहितेचा कालावधी कमी झाल्यास ते राज्य सरकारलाही अडचणीचे ठरणार नाही, असे सूत्रांनी सांगितले.

## घंटागाडी कामगारांना सुट्ट्यांचा मोबदला!

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी वेळप्रसंगी स्वतःचे आरोग्य धोक्यात घालून हे स्वच्छतादूत कर्तव्य पार पडतात. ऊन, वारा, पावसामध्ये घंटागाडीसेवा सुरू ठेवली जाते. कारण, ती अत्यावश्यक असल्याने कोणतेही कारण पुढे देता येत नाही. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असणाऱ्या घंटागाडी कामगारांनी कोरोना वैश्विक संकटातही पनवेलचा कचरा उचलला होता. साडेपाचशे कामगार या ठिकाणी काम करतात. अविरतपणे कचरा उचलून घोट येथील डम्पिंग डम्प केला जातो. नियमानुसार संबंधित कामगारांना वर्षातून २१ दिवस पगारी सुट्ट्या देणे क्रमप्राप्त आहे. परंतु, नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ या चौदा महिन्यांच्या कालावधीमध्ये अनेक घंटागाडी कामगारांना सुट्ट्यांच्या दिवशी काम करावे लागले. मात्र, त्या बदल्यात त्यांना सुट्ट्यांचे पैसे देण्यात आले नाहीत. यासंदर्भात आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला. या व इतर मागण्यांसाठी त्यांनी आमरण उपोषणाचाही इशारा दिला होता. परंतु, प्रशासनाने त्यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यानुसार घंटागाडी कामगारांना मागील सुट्ट्यांचा पगार दिला जाणार आहे. यासंदर्भात उपायुक्त वैभव विधाते यांनी संबंधित एजन्सीला आदेश दिले आहेत.

**गणवेश आणि चप्पल ही मिळणार!**

आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी घंटागाडीविषयक कामगारांना गणवेश आणि चप्पल देण्याबाबतची मागणी केली होती. त्यानुसार प्रत्येक कामगारांचे माप घेऊन त्यांना दोन गणवेश दिले जाणार आहेत. त्याचबरोबर चप्पल जोडसुद्धा काही दिवसांत देण्यात येणार आहेत.

## ६६ वीजचोरांना महावितरणचा दणका

चोरी होत असल्याचे आढळून आले. महावितरणकडून वीजचोरीचे मूल्यांकन केले असता वीजचोरांनी १ लाख २१ हजार युनिट वीजचोरी केल्याचे आढळून आले. याचे मूल्यांकन ३० लाख ७३ हजार रुपये आहे. वीजचोरी करणे, हा दंडनीय अपराध आहे. गुन्हा सिद्ध झाल्यास कठोर कारावास आणि आर्थिक दंडाची तरतूद वीज कायद्यात करण्यात आली आहे.

वरील कारवाई महावितरण कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, कल्याण दोन मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता व्ही.एस. फुंदे, कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहाय्यक अभियंता निलेश शिर्के, शाखा अभियंता तुकाराम घोडविंदे, धनंजय पाटील, सचिन पवार, योगेश चेंदवणकर यांनी पार पाडली.

## पेज नदीत आढळला मृतदेह

देण्यात आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाची पाहणी केली. मृतदेह पाण्यात झुडपात असल्याने तो बाहेर काढणे अत्यंत कठीण झाले होते. शेवटी कर्जत पोलीस यांच्याकडून मृतदेह बाहेर काढण्यासाठी खोपोली येथील हेल्थ फाऊंडेशनची मदत घेण्यात आली. हेल्थ फाऊंडेशनचे अमोल कदम, अमोल ठगेकर, हनीफ खर्जीकर, निलेश कुदळे, महेश भोसले, विजय भोसले, सुमित गुरव यांनी घटनास्थळी दाखल झाले, त्या रेस्क्यू टीमकडून मृतदेह नदीबाहेर काढून तो पोलिसांचे ताब्यात देण्यात आला.

## आता मराठ्यांचं वादळं दिल्लीत धडकणार

अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचं अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून मुंबईमध्ये काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाला सुरुवात केली होती, लाखो मराठा बांधव हे जरांगे पाटील यांच्या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. या आंदोलनाला यश आलं, सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या आहेत, तर काही मागन्या माण्य करण्यासाठी वेळ मागितला आहे. मराठा समाजाची जी मुख्य मागणी होती, राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करा, त्याचा जीआर सरकारने काढला आहे, त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी ही मोठी घोषणा केली आहे. दरम्यान, राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा सरकारने जीआर काढल्यानंतर आता ओबीसी समाजानं आक्रमक भूमिका घेतली आहे. ओबीसी समाजाकडून या जीआरला विरोध होत आहे. मराठा समाजाला आमच्यामधून आरक्षण नको, अशी भूमिका ओबीसी समाजाची आहे, तर दुसरीकडे याच गॅझेटवरून बंजारा समाज आणि आदिवासी समाजदेखील आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. आमचा एसटीमध्ये समावेश करावा, अशी मागणी बंजारा समाजाची आहे.

## भुजबळांच्या अडचणीत वाढ

मंत्रीपदावरुन हकालपट्टी करणार की नाही, असा प्रश्न अंजली दमानिया यांनी विचारला आहे. अंजली दमानिया म्हणाल्या की, छगन भुजबळ आणि त्यांच्यासारखे असंख्य मंत्री जे अमाप पैसा कमावतात, त्यांच्याविरुद्ध कितीही लढलात तरी तुम्ही जिंकणार नाहीत, याची त्यांना खात्री असते. छगन भुजबळ यांनी कोविड काळात पिटीशन फाईल केलं. तेव्हा महाराष्ट्र सदन घोटाळ्याला चॅलेंज करता येणार नाही, असा जीआर काढण्यात आला. त्यानंतर फडणवीस सरकारमध्येसुद्धा असाच प्रकार झाला. म्हणून छगन भुजबळ यांच्यासारखे मंत्री माझ्यावर अब्रू नुकसानीचे दावे धडधड करतात.

## माणगावात व्हॉट्सअॅपद्वारे मटका जुगार

कांतिलाल छेडा. रा. माणगाव, सदानंद दत्ताराम जाधव रा. सुरव तर्फे तळे, ता. माणगांव, यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायगड पोलिसांचा नवा उपक्रम सुरू झाला आहे. गुन्हेगारीविरुद्ध नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी रायगड पोलिसांनी 'रायगड दृष्टी' हा नवा व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुरू केला आहे. या चॅटबॉटच्या माध्यमातून नागरिक मटका जुगार, अवैध दारू व्यापार, अंमली पदार्थ आणि इतर बेकायदेशीर कारवायांबाबत पूर्णपणे गुप्तपणे तक्रार नोंदवू शकतात. तक्रारी संबंधित अधिकाऱ्यांकडे त्वरित पाठवून तातडीने कारवाई केली जाणार आहे.

## मुंबई-कोकण रो-रो सेवेला दसऱ्याचा मुहूर्त!

सेवा सुरू होणार असल्याचे ऐकून आम्हाला खूप आनंद झाला आहे. आता मुंबई ते कोकण प्रवासाला नवा पर्याय मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया रत्नागिरी व सिंधुदुर्गातील प्रवाशांनी दिली.

**यशस्वी चाचणी**

मुंबई ते रत्नागिरी-सिंधुदुर्ग मार्गावर रो-रो सेवेची प्रायोगिक चाचणी यशस्वीरित्या पार पडली. वेग, प्रवासी क्षमता व सुरक्षा तपासणी समाधानकारक ठरली असून, सागरी सुरक्षा यंत्रणांकडूनही हिरवा कंदील मिळाला आहे. आसन क्षमता ५५२ प्रवासी (इकोनॉमी), ४४ (प्रीमियम इकोनॉमी), ४८ (बिझनेस), १२ (फर्स्ट क्लास), वाहन क्षमता : ५० चारचाकी व ३० दुचाकी.

## विजांसह पावसाची शक्यता

विदर्भ आणि परिसरावर समुद्र सपाटीपासून ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. दक्षिण कर्नाटकपासून कोमोरीन भागापर्यंत दक्षिणोत्तर कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. यातच राज्यात मुसळधार पाऊस हजेरी लावत आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. उपराजधानी नागपुरात बुधवारी अवघ्या तीन तासांत ५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. पावसाच्या हजेरीनंतरही काही ठिकाणी कमाल तापमान अद्यापही तिशीपार कायम आहे. अमरावती येथे राज्यातील उच्चांकी ३३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

राज्यात वादळी पावसाला पोषक हवामान होत असून, बुधवारी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, बीड जिल्ह्यांत जोरदार पावसाची, तर रायगड, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. उर्वरित राज्यात हलक्या सरींची अंदाज आहे.

---

### जाहीर नोटीस

दिनांक १७/०९/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सूचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील.

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. संजु सुरेश केणे | ७७/१९ | ०-१०-०० | ०-०८ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजून इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजून कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**अॅड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM e-Tender Notice No. 11/2025-26

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No | RFx no | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 20/2025-26 | 7000037630 | Annual civil maintenance works for Dombivali, Dombivali Pal, Morivali, Anandnagar, Jambhul, Neral,Palava S/stn colony, offices under Kalyan SDn for FY 2025-26. | 3101090.00 |
| 21/2025-26 | 7000037631 | Annual civil maintenance works for Mohane, Murbad, Washala, Shahapur,Technocraft Murbad Century Rayon Ulhasnagar, Jindal, Vashind S/stn, Colony offices under Kalyan SDn for FY 2025-26. | 3028423.40 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact Person :** Dy. Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325/ Mob no. 9765644291

**Executive Engineer (Civil), Panvel**

---

## K.T.S.P.M's Law College, Khopoli

**(Approved by BCI, Govt. of Maharashtra & Affiliated to University of Mumbai)**
**Address: Near old Mumbai Pune Highway, Khopoli, Tal-Khalapur, Dist-Raigad-410 203**
**• Phone No-9850357228/8149171352**
**• Email ID:- ktspmlawcollege2024@gmail.com**

ADMISSION NOTICE FOR ACADEMIC YEAR 2025-26
FOR FIRST YEAR LL.B (3 Years) COURSE AGAINST CAP VACANCY ROUND & MANAGEMENT ROUND

COLLEEG CODE-24079

| Sr. No | Choice Code | Course Name | Duration | Sanctioned Intake | Institutional Level Vacant Seats |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2407910812 | LL.B (3Years) | 3 Years | 60 | 3 |

Admission will be on the basis of inter-se merit of candidates who have applied to the Institute in the prescribed from within the due date and on the basis of rules published in the information Brochure by the Govt. of Maharashtra, State common Entrance Test Cell, for admission for A. Y. 2025-26

**Admission Schedule:** Sale & Acceptance of Application form
From 18/09/2025 To 20/09/2025 between 09.00am to 5.00 p.m.

**Eligibility Criteria-**Please refer information brochure of Govt. of Maharashtra, State Common Entrance Test Cell,(M.S) for Admission to full time Professional degree course i.e. LL.B (3Years) for A. Y. 2025-26.

**(Santosh G. Jangam)**
**Chairman, KTSP**
**Mandal Khopoli**

**(Mr. Narendra C. Shah)**
**Chairman, KTSPM's**
**Law College Khopoli**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. जयराम बाळू कांबळी २) श्री. दत्ताराम बाळू कांबळी ३) श्रीमती जनाबाई महादेव ठाकूर ४) श्रीमती निलम बाळाराम पाटील ५) श्रीमती कल्पना नारायण शेळके ६) श्रीमती शुभांगी शंकर कांबळी ७) श्रीमती श्वेता शंकर कांबळी ८) श्रीमती लक्ष्मी बाळू कांबळी सर्व रा.मु. चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**- : मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चिंचोटी ता. अलिबाग | ५७/१/अ/ब | ०-१९-५० पो.ख. ०-०१-५० ०-२१-०० | १-८७ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

सही/-
अलिबाग
दि. १६-०९-२०२५

**अॅड. आर.बी. कोसमकर**
चिरायु, ब्राह्मण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

---

### पनवेल महानगरपालिका,

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.
वेबसाईट: www.panvelcorporation.com ईमेल: panvelcorporation@gmail.com

जा.क्र./निवडणूक/२१२५/प्र.क्र./१६९२/२०२५ दिनांक :- १७/०९/२०२५

**जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वजनिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेस मा. राज्य निवडणूक आयोग यांनी मान्यता दिलेली असून मा. उपसचिव नगर विकास विभाग यांच्याकडील पत्र क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ सोबतच्या सुधारित वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ३ सप्टेंबर २०२५ ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली व हरकती व सूचना मागवणे बाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात आली. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांच्या अध्यक्षतेखाली अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत सुनावणी घेतली जाणार आहे.

**सुनावणीचे ठिकाण : आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल रायगड**
**सुनावणीचा वार : गुरुवार**
**सुनावणीचा दिनांक : १८/०९/२०२५**
**सुनावणीची वेळ : १२.३० ते ४ वाजेपर्यंत**

आपण विहित कालावधीत हरकत/सूचना घेतली असल्यास व आपणास सुनावणीची नोटीस अथवा सूचना प्राप्त झाली नसल्यास उपरोक्त नमूद ठिकाणी नमूद वेळेत आपण सुनावणी करता उपस्थित राहावे.

सही/-
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त,(निवडणूक)**
**पनवेल महानगरपालिका**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सौ. किर्ती गोविंद वाघानी, रा - प्लॉट नं १७, सरगम बंगलो, जैन मंदीराजवळ, सेक्टर ८/अ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६७४ यांनी आमचे आशिलांना खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती (सदर मिळकती) बोजाविरहीत स्पष्ट, कायदेशीर आणि विक्री योग्य स्वामित्वाने खुल्या व शांत ताबेकब्जासहीत विक्री करण्याचे मान्य केले आहे.

तरी सदर मिळकती किंवा त्यांचा कोणताही भाग किंवा त्यांच्यापैकी कोणताही हिश्श्यांच्या संदर्भात व त्यावरील एफएसआय/टीडीआर लाभांसंदर्भात कोणत्याही व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही वा कोणत्याही प्रकारचा क्लेम विक्री मार्गाने, अदलाबदल भाडेपट्टा, गहाण (इक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षिस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, हिंदु एकत्र कुटुंब, पोटगीचा हक्क, मेंटेनन्स, मृत्युपत्र, ताबा, इजमेंट, पोट भाडेपट्टा, असाईनमेंट, कुळ, लायसन्स, प्लेज, गॅरंटी, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, विकसन व्यवस्थापन, संयुक्त करार, सह उद्योग, कुलमुखत्यारपत्र, भागिदारी, कर्ज, आगावू देणे, लिज पेंडन्स, मनाई किंवा इतर अॅटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅट्युटरी) अधिकारी किंवा लवादाचा, हुकूमनामा, आदेश किंवा अॅवॉर्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट अगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या अधोरिखीत पत्त्यावर संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर नोटीसीत नमुद मिळकतीं संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल आणि सदर व्यवहार आमचे आशिलांद्वारे पुर्ण केला जाईल.

**वर संदर्भित परिशिष्ट**
('सदर मिळकती')

मौजे कलोते रयती, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, तालुका व नोंदणी उपजिल्हा खालापूर, जिल्हा व नोंदणी जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथील शेतजमिन मिळकती

| अ.क्रं. | सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र (हे-आर-पॉ) |
|---|---|---|
| १ | ३३/२/अ | १-५५-०० |
| २ | ३६/१/अ | ०-५९-०० |
| ३ | ३६/१/क | ०-५४-०० |
| ४ | ३६/१/ड | ०-५४-०० |
| ५ | ३६/२ | ०-४९-८० |
| ६ | ३७/१/अ | ०-६१-२० |
| ७ | ३७/१/ब | ०-४५-८० |
| ८ | ३७/१/क | ०-४४-५० |
| ९ | ३७/३ | १-२१-४० |
| १० | ३८/१ | १-१९-९० |
| ११ | १११ | २-६४-१० |
| १२ | ११२/१ | १-४२-८० |
| | **एकूण** | **११-७१-२०** |

तारीख : १८/०९/२०२५

सही/-
**मे. लॉ पॉईंट**
**अॅडव्होकेटस अॅन्ड सॉलिसिटर्स**
३०१, वैभव चेंबर्स, तिसरा मजला,
जगत विद्या मार्ग,
गुरुनानक हॉस्पिटल जवळ,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पु), मुंबई - ४०००५१
Email : response@lawpointindia.com

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१२/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड
वय : ७२ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. काकल, पो. उसर खुर्द, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत काकल,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड यांची मुलगी श्रीम. रक्षणी धर्मा गायकवाड - लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रक्षणी मुकेश जाधव- लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९९० रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०५/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. रक्षणी धर्मा गायकवाड- लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रक्षणी मुकेश जाधव - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९९० रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड यांची मुलगी श्रीम. रक्षणी धर्मा गायकवाड- लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रक्षणी मुकेश जाधव - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९९० रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही/-
ता. १५/०९/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. २१७/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. हाफिजा आदम डावरे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. हाफिजा मोहम्मद शफी कर्जीकर
लग्नानंतरचे नाव
वय ७० वर्षे, धंदा : गृहिणी, — अर्जदार
रा. मु. पो. दहिवली,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. हाफिजा आदम डावरे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. हाफिजा मोहम्मद शफी कर्जीकर- लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९५५ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०५/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९५५ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. हाफिजा आदम डावरे लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. हाफिजा मोहम्मद शफी कर्जीकर- लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/१२/१९५५ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही/-
ता. २६/०८/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. २११/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड
वय ७२ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. काकल, पो. उसर खुर्द, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत काकल,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड यांची मुलगी श्रीम. रसिका धर्मा गायकवाड - लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रसिका भिमराव शिंदे-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०५/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०५/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. रसिका धर्मा गायकवाड- लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रसिका भिमराव शिंदे - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०५/१९८६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. पुष्पा धर्मा गायकवाड यांची मुलगी श्रीम. रसिका धर्मा गायकवाड- लग्नापुर्वीचे नाव व श्रीम. रसिका भिमराव शिंदे - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे काकल ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०५/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही/-
ता. ११/०९/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# खालापूरात मराठा आरक्षणासंदर्भात हरकत

## तहसीलदार अभय चव्हाण यांना निवेदन

| खोपोली | प्रतिनिधी |

घटनेने दिलेले आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असताना सामाजिक दृष्ट्या मागास नसलेल्या मराठा समाजाला ओबीसीमध्ये घेत आहात, हे मूळ ओबीसीवर अन्याय करणारे आहे. म्हणून ओबीसी समाजाचा विचार करून ओबीसीला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशा मागणीचे आणि हरकतीचे निवेदन बुधवारी (दि.१७) ओबीसी समाज खोपोली शहर व खालापूर तालुक्याच्यावतीने तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्फत सचिवांना देण्यात आले.

ओबीसीमध्ये साडेतीनशे पेक्षा जास्त जातींचा समावेश आहे. त्या जातींनाच अजून पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यात पुन्हा एक मोठा वर्ग जर ओबीसीमध्ये समाविष्ट होत असेन तर हा मूळ ओबीसींवर अन्याय आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये सामाजिक राजकीय न्यायाची तरतूद आहे.



उद्या जर मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसीमध्ये आले तर ओबीसीमधून सरपंच नगरसेवक जि.प. सदस्य, पंचायत समिती सदस्य तेच होतील, मग ओबीसी बांधवांना राजकीय न्याय कसा मिळेल? ओबीसी फक्त मतदानापुरतेच शिल्लक राहतील. सगे सोयरे किंवा सरसकट हा आरक्षणाचा निकष नसून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास हा आरक्षणाचा निकष आहे. या निकषानुसार मराठा समाज ओबीसी आरक्षणासाठी पात्र होत नाही. तरीदेखील जो जी.आर. काढला गेला आहे तो त्वरित रद्द करावा. तसेच, १९६७ सालापूर्वीची पितृसत्ताक वंशावळी पद्धतीने कुणबी नोंद आहे त्यांची कायदेशिर वैधता तपासुन कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अशा हरकतीचे निवेदन तहसिलदार अभय चव्हाण यांच्याकडे देण्यात आले आहे. यावेळी ओबीसी समाजातील दोन प्रतिनिधींनींकडून प्रातिनिधिक स्वरूपात तहसिल कार्यालयात हरकतीचे निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, श्रीकांत पुरी, संतोष जंगम, सचिन मसुरकर, अरुण पुरी, संजय पाटील, सुरेखा खेडकर, रसिका शेट्टे, सुप्रिया नांदे, रामू पवार, हेमंत नांदे, नितीन चौधरी, पप्पू पाटील, कैलास वाडेकर, पप्पू शाहसने, राजू फक्के, मोहन केदार, दिनकर भुजबळ, किशोर पाटील, प्रशांत जगे, सुनील नांदे, विना गुरव यांच्यासह ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **“कुणबी म्हणून जे अधिकृत आहेत, त्यांनाच नियमांची पूर्तता व पडताळणी करूनच दाखले द्यावेत. समाजासमाजामध्ये दुरी निर्माण व्हावी, असा कुठलाही हेतू नाही. सगळ्या गरजवंताना न्याय मिळावा, मग तो कुठल्याही समाजाचा असो. तसेच, संपूर्ण राज्यात दोन समाजात दरी निर्माण करण्याचे काम काही मंडळी करीत आहेत, ते चुकीचे आहे.”**
>
> **– दत्तात्रेय मसुरकर, माजी नगराध्यक्ष तथा ओबीसी नेते**



# आंबिवलीतील घराला भीषण आग

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायतीतील आंबिवली गावातील एका शेतकऱ्याचे घर आगीत भस्मसात झाल्याची घटना घडली आहे. घराला आग लागली त्यावेळी घरात कोणीही व्यक्ती नसल्याने सुदैवाने जीवितहानी टळली आहे. मात्र, आगीत घराचे १०० टक्के नुकसान झाले आहे.

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माणगांव तर्फे वरेडीतील आंबिवली गावाच्या प्रवेशद्वारावर शेतकरी जगदीश कराळे यांचे घर आहे. त्यांच्या घराला पहाटे साडेतीन-चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. सुदैवाने त्यावेळी घरामध्ये कोणीही व्यक्ती नव्हती. त्यामुळे जीवितहानी टळली आहे. मात्र, राहत्या घराला आग लागल्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही आग विझवण्यासाठी आंबिवली गावातील स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत या आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु, ही आग इतकी भीषण होती की या आगीमध्ये घरातील सर्व वस्तू जळून खाक झाल्या आहेत. जगदीश कराळे यांच्या घरात असलेले सर्व फर्निचर, कपडे, धान्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच अन्य साहित्य असे सर्वच जळून खाक झाले आहे. तर, घराच्या छपरावरील सर्व सिमेंट पत्रे देखील जळून जमिनीवर पडले. यावरून या आगीची भीषणता लक्षात येते. या घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. मात्र, आगीचे कारण कळू शकले नाही.

## निवडक

### पोस्ट कार्यालयात नागरिकांची गैरसोय

**पनवेल :** कळंबोली पोस्ट कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना कार्यालयाची कार्य प्रणाली डोकेदुखी ठरू लागली आहे. अनेकदा येथील सर्व्हर डाऊन होत असल्याने व कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांना मिळत असलेल्या वागणुकीमुळे या पोस्ट कार्यालयात दररोज शाब्दिक चकमक होताना दिसत आहे. कळंबोलीतील पोस्ट कार्यालयात गेल्या काही महिन्यांपासून येथील नागरिकांना आरडी, एफडी अशा विविध योजनांचे पैसे भरण्यासाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. या सर्वांवर कळंबोली पोस्ट कार्यालयातील अधिकारी यांनी सरवर डाऊन असल्याचे कारण सांगून नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहण्यास सांगतात. नंतर वेळ संपल्याचे कारण सांगत त्यांना परत पाठवत आहेत. दरम्यान, एखाद्या जागरूक नागरिकाने आवाज उठवल्यानंतर आमच्या कार्यालयाची तुम्ही तक्रार करा, असे ते सांगतात. त्यातून त्यांच्यात नियमित वाद होत आहेत.

### बार कॅशिअरला जबर मारहाण

**बोर्लीपंचतन :** येथील वैभव बारमध्ये कॅशियरचे काम करणाऱ्या भालचंद्र पाडुरंग माळवदे (६२) यांना किरकोळ कारणावरून कार्ले बसथांबा येथे शुक्रवार (दि.१२) रात्रीच्या सुमारास दोन व्यक्तींकडून मारहाण व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोर्लीपंचतन येथील वैभव बार मध्ये रात्री दहाच्या सुमारास सुभाष भिकू धुमाळ व सुनिल आत्माराम गायकर मद्यप्राशन करण्यासाठी आले होते. यावेळी माळवदे यांच्याशी बारचे बील देताना या दोघांनी वादविवाद व शिविगाळ करण्यास सुरूवात केली. काही वेळाने धुमाळ व गायकर आपल्या दुचाकी वरून निघून गेले. बार बंद करून माळवदे हे दुचाकीवर दांडगुरी येथे आपल्या घरी जात असताना कार्ले बस थांब्याजवळ त्या दोघांनी त्यांची दुचाकी रस्त्याच्या मधोमध लावली. त्यांनंतर माळवदे यांना दोघांनी हातबुक्यांनी व काठीने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. माळवदे यांच्या छातीवर,कानावर व हाताला मुकामार लागला आहे. याबाबत दिघी सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून दोन्ही आरोपीवर कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल संतोष चव्हाण पुढील तपास करीत आहेत.



### आहिल्याबाई होळकर चौकाच्या सुशोभीकरणाची मागणी

**नेरळ :** माथेरान येथील महात्मा गांधी रस्त्यावरील पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांना माथेरान धनगर समाजाच्यावतीने याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. कुशल प्रशासक न्यायप्रिय शासक जनकल्याणासाठी लढणाऱ्या म्हणून देशात मानाचे स्थान देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांचे माथेरान येथे स्मरक आहे. त्या चौकात सुशोभीकरण करावे, असे विनंती करणारे निवेदन माथेरान धनगर समाजाच्यावतीने माथेरान नगरपरिषदेला देण्यात आले. पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे यांना दिलेल्या निवेदनात माथेरान धनगर समाजाने पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर चौकात कमान उभारण्यात यावी. रात्रीच्या वेळी चौकाचे सौंदर्य अधिक उजळण्यासाठी आकर्षक आणि ऊर्जा-कार्यक्षम दिव्यांची व्यवस्था करावी. चौक परिसरात झाडे लावून आणि कुंड्यांमध्ये फुले, वेली लावून हिरवळ निर्माण करावी, ज्यामुळे परिसर अधिक सुंदर आणि शांत दिसेल आणि त्यामुळे होळकर चौकाला एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे स्थान बनवले जावे, अशी मागणी करण्यात आली.

### टेमपाले येथील रक्तदान शिबिरात ५१ रक्तबॅगा संकलित

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील जमातुल मुस्लिमीन टेमपाले यांच्यावतीने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने बुधवारी (दि.१७) जामा मशीद टेमपाले येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभून टेमपाले गावातून ५१ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. महिलांनीही या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करून समाजातील महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या शिबिराला लोणेरे येथील डॉ. अनिल मेथा यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन आयोजकांचे भरभरून कौतुक केले. टेमपाले गावात या रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

# पालिका उभारणार दैनिक बाजार

| उरण | प्रतिनिधी |

पनवेल महापालिकेने पनवेल, कळंबोली, कामोठे आणि खारघर येथे दैनंदिन बाजार उभारण्याचे ठरवले आहे. यासाठी सिडकाने भूखंड उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे लवकरच पनवेलकरांना ही सेवा उपलब्ध होणार आहे.

पनवेलमध्ये सध्या तात्पुरत्या स्वरुपात बाजार उपलब्ध आहेत. यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी कायमस्वरुपी बाजार उपलब्ध करून देण्यासाठी हे नियोजन केले आहे. त्यामुळे पनवेलकरांना बाजारांची चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. खारघर प्रभाग ‘अ’मध्ये सेक्टर ३, ४, ६, ११, १२, १५ व २० मधील एकूण १५ ठिकाणी, कळंबोली प्रभागात सेक्टर २, २ ई, ५ ई, ६, १०,१२, १४, १५ मधील एकूण १६ ठिकाणी, तर कामोठे प्रभागात सेक्टर १७ मध्ये ३८ ओटे, सेक्टर २१ मध्ये १४ ओटे, सेक्टर १८ मध्ये ४६ ओटे, सेक्टर १० मध्ये १४ ओटे अशा पाच ठिकाणी दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत. त्याप्रमाणेच पनवेल प्रभाग ‘ड’ मध्ये सेक्टर ६, १ एसई, २ ई, ३ ई, ४ ई, ७ डब्लू, ८ डब्लू, १० डब्लू.५ ए व ५ मधील १० ठिकाणी गरजेनुसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन पनवेलकरांच्या सेवेत सर्व सोयी सुविधांनी युक्त असे प्रशस्त दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

# लिफ्ट देण्याच्या बहाण्याने चोरी

**पनवेल :** नवीन पनवेल येथे लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका बँक व्यवस्थापकाची बॅग चोरी केल्याची घटना घडली आहे. भांडूप येथील बँक व्यवस्थापक यांना त्याच मार्गावरून स्कूटीवरून दोन मुले जात असल्याचे दिसले. त्यांनी त्यांना हात दाखवून लिफ्ट मिळेल का, असे विचारले. ती मुले लिफ्ट देण्यासाठी तयार झाली. त्यांना मागे बसायला सांगून त्यांच्या हातातली बॅग पकडतो, तुम्ही नीट बसा, असे सांगून ती बॅग स्वतःकडे ठेवली. आणि बँक व्यवस्थापक स्कूटीवर बसण्याच्या आत स्कूटी दामटवून ही दुकली तेथून फरार झाली. याप्रकरणी स्कूटीचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# व्यापाऱ्यांचा बर्फाच्या दर वाढीचा प्रस्ताव

## ■ विरोध केल्यास पुरवठा बंदचा इशारा

| चिरनेर | प्रतिनिधी |

मच्छीमारांसाठी बर्फ व्यापाऱ्यांनी बर्फाच्या दरात टनामागे ८० रुपयांची वाढ केली आहे. त्यानंतर दिड महिन्यातच वीज दरवाढीचे कारण पुढे करीत ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असो.चे पुन्हा आणखी प्रतिटन ८५ रुपयांच्या वाढीची मागणी केली. दरम्यान, बर्फाच्या दरवाढीवर मंगळवारी (दि.१६) झालेल्या बैठकीत मच्छीमार संस्थांनी विरोध केला आहे. मात्र, संस्थांच्या विरोधाला झुगारून असो.ने २० सप्टेंबरपर्यंत बर्फाच्या दरवाढीचा प्रस्ताव मान्य न केल्यास मच्छीमार संस्था व बोटींचा बर्फ पुरवठा बंद करण्याचा इशारा असोसिएशनने दिला आहे.



यंदा १ ऑगस्टपासून मासेमारीचा हंगाम सुरू झाला असून त्याच्या एक दिवस आधीच बर्फ पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी महागाई, मजुरी, मीठ व अमोनिया यांच्या किमती वाढल्याने बर्फाच्या प्रति टनामागे तब्बल ८० रुपयांची वाढ केली होती. त्यामुळे बर्फाचे भाव प्रतिटन २ हजार ३०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. मात्र, दिड महिन्याचा कालावधी संपुष्टात येत नाही तोपर्यंत ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असो.ने वीज दरवाढीचे कारण पुढे करीत पुन्हा प्रतिटन ८५ रुपयांची वाढीव मागणी केली आहे. त्यामुळे मच्छीमार व मच्छीमार संस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बर्फाच्या दरवाढीवर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

# जेएनपीएत साकारतोय इंधन साठवण प्रकल्प

| उरण | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील जेएनपीटी परिसरात तब्बल १२ हेक्टर क्षेत्रावर एलपीजी व द्रवरूप इंधन साठवण प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पात १,३२,००० घनमीटर क्षमतेचा एलपीजी टर्मिनल, ३,१८,००० घनमीटर क्षमतेचे द्रवरूप पेट्रोलियम संचय टाकी, तसेच ३५,००० मेट्रिक टन क्षमतेचा एलपीजी बॉटलिंग प्लांट उभारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, स्थानिक तसेच परिसरातील युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून केवळ पेट्रोल, डिझेल व नाफ्ता नव्हे, तर विमान इंधनासह तब्बल १०१ प्रकारची द्रवरूप इंधने साठवण्याची सोय करण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबई व बंदर परिसरातील औद्योगिक व व्यावसायिक अर्थकारणाला मोठी गती मिळणार आहे. मात्र, या प्रकल्पामुळे वाहतुकीवर ताण वाढण्याची शक्यता आहे. सध्या जेएनपीटी मार्गावर दररोज सुमारे २५ हजार वाहने ये-जा करतात. नव्या प्रकल्पामुळे एलपीजी व द्रवरूप इंधन वाहून नेणाऱ्या टँकर व कंटेनर वाहतुकीत वाढ होणार असून, त्यामुळे या परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर अधिक ताण पडणार आहे.

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर हलक्या व अवजड वाहनांची वर्दळ आणखी वाढणार असल्याने योग्य नियोजनाची गरज निर्माण झाली आहे. हा प्रकल्प प्रामुख्याने मध्य प्रदेश व पश्चिम भारतातील राज्यांना एलपीजी व इंधन पुरवठा करणार आहे. एजिस व्होपॅक टर्मिनल्स लिमिटेड या आघाडीच्या कंपनीचा हा जेएनपीटीतील दुसरा प्रकल्प असून, १७ जुलै रोजी सीआरझेड प्राधिकरणाने त्याला हिरवा कंदील दिला आहे.



# श्रीवर्धनमधील विजेचे खांब गटारात

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

मागील काही दिवसांपासून श्रीवर्धन शहरामध्ये सौरदिवे उभे करण्याचे काम सुरू आहे. हे काम सुरू असताना संबंधित ठेकेदाराने सर्वप्रथम गटाराच्या वरचे कोपिंग तोडून त्यामधून केबल फिरवली आहे. त्यानंतर चांगल्या सुस्थितीत बांधलेली गटारे तोडून त्या ठिकाणी सौरदिवे उभारण्याचा पाया कॉंक्रीट टाकून बनवण्यात आला आहे. शहराचा विकास होणे हे श्रीवर्धनच्या नागरिकांना अपेक्षितच आहे. परंतु, अशा प्रकारे काम करून जर का विकास केला जात असेल तर, श्रीवर्धनमध्ये पावसाचे पाणी तुंबल्याशिवाय राहणार नाही, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

सौरदिवे उभे करणाऱ्या ठेकेदाराने वाणी आळी, त्याचप्रमाणे टिळक मार्ग या परिसरामध्ये अनेक ठिकाणी गटारामध्ये खोदकाम करून त्या ठिकाणी स्लॅबचा पाया उभारला आहे. मात्र, नगरपरिषद प्रशासनाच्या अभियंत्यांकडून या ठेकेदाराला कोणत्याही प्रकारे अशी कामे करताना अडवण्यात आलेले नाही. ठेकेदाराला काम करताना अभियंत्यांकडून वेळोवेळी सूचना दिल्या जात नसल्यामुळेच ठेकेदार मनमानीपणे काम करत असल्याचे बोलले जात आहे. तरी अशाप्रकारे गटारामध्ये विजेचे खांब उभे करण्यासाठी बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराला मुख्याधिकारी तथा प्रशासक विराज लबडे यांच्याकडून कारवाई केली जाईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# वातावरणामुळे शेतकरी हैराण

**पाताळगंगा :** सायंकाळी पाऊस पडत असल्यामुळे शेतात तयार झालेल्या धान्याचे नुकसान होत आहे. त्यामुळे बळीराजा चांगलाच धास्तावला आहे. दरवर्षी हस्त नक्षत्रांचा चाहूल लागताच शेतीचे प्रचंड नुकसान होत असते. आपला उदार निर्वाह शेतीवरच असल्यामुळे शेती शिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही.

# पालिका परिवहनमध्ये पासची मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई महानगरपालीका परिवहन सेवेच्या बसमधून प्रवास करण्यासाठी दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवासाचे पास दिले जातात. परंतु, पनवेल महानगरपालीका व नवी मुंबई महानगरपालीका हे पास प्रदान करण्यासाठी अतिशय जटील, क्लिष्ठ व त्रासदायक प्रक्रिया अवलंबित आहे. आधिच दिव्यांग



व ज्येष्ठ नागरीक शारिरीक अक्षमतेमुळे अतिशय त्रासदायक अनूभव पदोपदी घेत असतात. सदरहू पासासाठी सर्वप्रथम पनवेल महानगरपालीकेमध्ये दिव्यांगत्व व रहिवासाबाबत सर्व कागदपत्रे दाखल करावी लागतात. वास्तविक भारत सरकारने प्रदान केलेल्या वैश्विक दिव्याग कार्ड व प्रमाणपत्रा वर हीच सर्व माहीती उपलब्ध आहे. तरी अशा प्रकारची सेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी महाराष्ट्र दिव्यांग विकास फाऊंडेशनचे जिल्हाप्रमुख भरत जाधव व विद्याधर केळकर यांनी पनवेल महापालिकेच्या आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## रेवदंडा मच्छीबाजारात खवय्यांची झुंबड | अद्याप मासळीची आवक कमी

# मोठ्या माशांचे दर आवाक्याबाहेर

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

**पितृपंधरवड्यात मांसाहार वर्ज्य असल्याने मासळीला मोठी पसंती असते. परंतु, मोठ्या व चवदार माशांचे दर आवाक्यात नसल्याने खवय्यांच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे. तरीदेखील रेवदंडा हायस्कूल शेजारी भरणाऱ्या मासळी बाजारात बुधवारी (दि.१७) ग्राहकांची गर्दी उसळली होती.**

कोकणातील मासळी ही पर्यटक आणि खवय्यांसाठी नेहमीच आकर्षणाचा विष असते. मागील काही दिवस मासळीवर परिणाम झाला होता; मात्र, आता परतीचा पाऊस ओसरत असल्याने मासळीचे आगमन थोडेफार वाढले आहे. त्यामुळे कोळी व महिला मच्छी विक्रेत्यांच्या चेहऱ्यावरही



| मासळी प्रकार | दर |
|---|---|
| छोटी सुरमई | २०० रुपये किलो |
| मोठी सुरमई | ६०० रुपये किलो |
| बांगडा | ८० रुपये किलो |
| सौंदाळे | २५० रुपये किलो |
| छोटा सरंगा | २५० रुपये किलो |
| मोठा सरंगा | ६००-७०० रुपये किलो |
| कोळंबी | ३५० रुपये किलो |
| टायनी कोळंबी | ५०० रुपये किलो |
| छोटे पापलेट | ४५० रुपये किलो |
| मोठे पापलेट | १२०० रुपये किलो |

समाधान दिसू लागले आहे. सध्या पारंपारिक आणि पर्ससीन नेट मासेमारी सुरू झाली असली तरी मासळी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. परिणामी, मासळींचे दर अजूनही कमी झाले नाहीत. काहीजण पितृपंधरवड्यात मांसाहार खात नाहीत. परंतु, त्यांची मासळीला मोठी पसंती असते. सध्या मासळीची आवक कमी असल्यामुळे दरांच्या बाबतीत मात्र खवय्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. त्यातच बाजारपेठेतील मुख्य मासळी बाजारात रेवदंडा बंदरावरून आणलेली मासळी किलोला ५० ते १०० रुपये जास्त दराने विकली जात होती. त्यामुळे दर वाचवण्यासाठी अनेक ग्राहक थेट रेवदंडा हायस्कूलजवळील मासळी बाजारात गर्दी करत होते. कारण बंदरावर उतरलेली मासळी त्याचठिकाणी विकली गेल्याने तिचा दर बाजारापेक्षा स्वस्त मिळतो. त्यामुळे रेवदंडा हायस्कुलजवळील बाजारात खवय्यांचा मोठा जमाव दिसून आला.

पितृपक्षामुळे मांसाहार वर्ज्य असला तरी कोकणात मासळीची चव चाखण्यासाठी स्थानिकांसोबत पर्यटकांचीही मोठी गर्दी होत आहे. दर कडाडलेले असले तरी चवदार मासळीची चाहूल लागली की खवय्ये मागे हटत नाहीत, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. त्यामुळे बुधवारी या ठिकाणी खवय्यांची मासळी खरेदीसाठी झुंबड पडलेली.

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई ४०० ०७४
सीआईएन - L24110MH1978GOI020185

जाहिरात क्र.–04022025–R
अधिसूचना

जुलै २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या **बॅकलॉग रिक्त जागांसाठीच्या विशेष भरती मोहिमेत** (जाहिरात क्रमांक ०४०२२०२५-आर) सर्व तात्पुरत्या निवडलेल्या उमेदवारांना **"वैध जात वैधता प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे. ही आवश्यकता जाहिरातीच्या **"आरक्षण/सवलती/शिथिलता"** विभागाच्या कलम I (d) अंतर्गत नमूद केली आहे.

कौशल्य चाचणीसाठी तात्पुरत्या निवडलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी 'जात वैधता प्रमाणपत्र' (एससी/एसटी/ओबीसी) सादर करणे बंधनकारक आहे.

कागदपत्र पडताळणीच्या टप्प्यात ‘वैधता प्रमाणपत्र’ प्रदान करण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना पुढील निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन)**

समृध्दिची एकत्र वाटचाल

# वक्फ- सरकारला चाप

वक्फ बोर्डासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय म्हणजे केंद्र सरकारच्या मनसुब्यांना लावलेला चाप आहे. हा अंतरिम किंवा हंगामी आदेश आहे. पण त्याने मुस्लिम पक्षकारांना पुरेसा दिलासा मिळावा अशी व्यवस्था झाली आहे. मुळात वक्फ बोर्डामध्ये केंद्राने हस्तक्षेप करण्याचा हेतू हाच राजकीय होता. मुस्लिम समाजाला प्रत्येक बाबतीत अपराधी वाटायला लावणे किंवा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हे या सरकारचे धोरण राहिले आहे. यासाठी तलाकच्या प्रश्नावर नवीन कायदा करण्यात आला. शाळा-कॉलेजात हिजाब घालण्याच्या मुद्द्याला अवास्तव महत्व दिले जाते. याच रीतीने वक्फ बोर्डामध्ये प्रचंड अनागोंदी असून यात देशद्रोही प्रकार चालतात असे भासवण्याचा भाजपचा प्रयत्न होता. वास्तविक मालमत्ता, जमिनी यांचा प्रश्न आला की सर्वत्रच काही ना काही वादविवाद वा भानगडी होत असतात. आपली देवळे, मठ, काही देवांची संस्थाने यांच्या मालमत्तांच्या असंख्य भानगडी कोर्टात आहेत. गुरव जमिनींसारखे प्रश्न आहेत. ख्रिश्चन व पारशी यांची संख्या कमी असल्याने जाणवत नाही, पण त्यांच्या चर्च व अग्यारीच्या संबंधानेही हे वाद होत असतातच. मुस्लिमांची संख्या सुमारे चौदा टक्के आहे. ते भारतभर पसरलेले आहेत. शिवाय अनेक ठिकाणी पूर्वी मुस्लिमांचे राज्य असल्याने त्यांनी बक्षिस किंवा अन्य मार्गांनी दिलेल्या जमिनी इत्यादींचे प्रश्न भारतभर आहेत. शिवाय मुस्लिमांमध्ये समाजासाठी जमिनी दान देण्याची पध्दत आहे. ही जमीन वक्फकडे जाते. पूर्वी मशिदीमार्फतच त्यांचा वापर केला जाई. नंतर या जमिनींच्या योग्य वापरासाठी वक्फ बोर्डांची स्थापना करण्यात आली. त्यात गैरव्यवहारांच्या तक्रारी वाढल्या. मात्र हा सगळा अनियंत्रित कारभार होता हे खरे नव्हे. कारण वक्फच्या निर्णयांबाबत कोर्टात दाद मागण्याचा पर्याय खुला होता. अशी शेकडो प्रकरणे सर्व देशभरांच्या कोर्टात दाखल आहेत. सरकारनेही यात वेळोवेळी हस्तक्षेप केला आहे. या बोर्डांवर सध्यादेखील सरकारचा अधिकारी असतोच. प्रसंगी ही बोर्डे सरकारांनी बरखास्तही केली आहेत. त्यामुळे मुस्लिमांना वक्फच्या बाबतीत काहीतरी भयंकर अधिकार व स्वातंत्र्य आहे आणि त्यांचे काय चालू आहे ते कळत नाही अशी काही स्थिती नव्हती.

### खोडसाळ दृष्टिकोन

हा चुकीचा समज किंवा मुद्दाम पांघरेलेले अज्ञान हाच मुळी केंद्राच्या वक्फ सुधारणा कायदा आणण्याचा आधार होता. त्यामुळे त्यात मुद्दाम खोडसाळ तरतुदी करण्यात आल्या होत्या. वक्फ बोर्डावर बिगरमुस्लिमांची नियुक्ती करण्याची तरतूद हे त्याचे ठळक उदाहरण. वास्तविक वक्फ ही प्रथा मुस्लिमांमध्येच आहे. त्यामुळे तिला धार्मिक स्वरुप प्राप्त होणे साहजिक आहे. पण सरकारने यात मुद्दाम पाय घालण्याचा प्रयत्न केला. त्याला सर्वोच्च न्यायालयाने रोखले असून केंद्राच्या वक्फ बोर्डात बावीस सदस्यांपैकी फक्त चार सदस्य बिगरमुस्लिम असू शकतील असे बंधन घातले. राज्यात ११ सदस्यांपैकी केवळ तीन सदस्य बिगरमुस्लिम असू शकणार आहेत. यामुळे बिगरमुस्लिमांनी बहुमत करून भलतेच निर्णय घेण्याचा अनवस्था प्रसंग टळणार आहे. न्यायालयाचा हा निर्णय वास्तवाला धरून आहे. अगदी अलिकडे तिरुपती देवस्थानातील कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ते मुस्लिम असल्यामुळे काढून टाकण्यात आले. तिरुपती किंवा केरळमधील मोठ्या देवळांच्या संस्थानांमध्ये मुस्लिम किंवा अन्य धर्मीयांना प्रवेश मिळण्याची सुतराम शक्यता नाही. हिंदू धर्मीयांना ते आवडणार नाही. अशा स्थितीत मुस्लिमांच्या वक्फला वेगळा न्याय लावणे हा सरळसरळ अन्याय होता. तो सर्वोच्च न्यायालयाने दूर केला हे बरे झाले. दुसरे म्हणजे वक्फच्या संपत्तीबाबत कोणी तक्रार केली तर त्यावर जिल्हाधिकारी निवाडा करू शकतील अशी केलेली तरतूदही स्थगित करण्यात आली आहे. अन्यथा, भाजपसारख्या कोण्या पक्षाशी संबंधित कार्यकर्त्याने किंवा राज्य सरकारच्याच एखाद्या खात्याने वक्फ मालमत्तेबाबत आक्षेप घ्यायचा आणि जिल्हाधिकारी, जे राज्याचेच प्रतिनिधी असतात त्यांनी त्याचा निवाडा करायचा असे प्रकार घडले असते. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना खूप व्यापक अधिकार मिळणार होते व पूर्वलक्ष्यी प्रभावाने वक्फमधून मालमत्ता बेदखल करण्याच्या शक्यताही वाढणार होत्या. त्यांना आता आळा बसणार आहे.

### धर्मनिरपेक्षतेला कौल

वक्फला मालमत्ता दान करणारा इसम हा किमान पाच वर्षांपासून इस्लामचे पालन करणारा असायला हवा अशीही विचित्र अट केंद्राने नव्या कायद्यात घातली होती. हिंदूंचे बेकायदा धर्मांतर करून त्यांच्या मालमत्ता वक्फद्वारे हडपल्या जात असतात असा खोटा प्रचार भाजपवाले करीत असतात. त्याला आधार देण्यासाठीच जणू ही तरतूद केली गेली होती. पण सक्तीचे धर्मांतर होत असेल किंवा मालमत्ता जबरदस्तीने काढून घेतली जात असेल तर त्यावर दाद मागण्यासाठी इतर कायद्यांचा पर्याय उपलब्ध असतोच. तरीही मुद्दाम ही तरतूद करून असे प्रचंड प्रकार चालू असल्याचे भासवले जाणार होते. पण सर्वोच्च न्यायालयाने तिला स्थगिती दिली. एखादी व्यक्ती पाच वर्षे इस्लामचे पालन करते आहे की नाही हे ठरवण्याचे नियम काय असा सवाल न्यायालयाने केला. त्यामुळे केंद्राच्या गैरइराद्यांना उघडे पाडण्याचे काम झाले. वक्फ बाय यूझर संदर्भात स्पष्ट निर्णय आलेला नसला तरी न्यायालय या प्रकरणाकडे काय दृष्टीने पाहते आहे हे स्पष्ट झाले आहे हे बरे झाले. एखादी मशीद, दर्गा किंवा इतर मालमत्ता अनेक वर्षांपासून एखाद्या जागेवर असेल तर ती वक्फ असण्याला पूर्वी आक्षेप घेतला जाऊ शकत नव्हता. मुस्लिमांची वहिवाट असल्याने ती मान्य करावी असा यातला शिरस्ता होता. पण केंद्राने तो रद्द करण्याचा घाट घातला. त्यानुसार निव्वळ वहिवाट आहे म्हणून वापरकर्त्यांचा हक्क वैध ठरणार नाही असा बदल करण्यात येणार होता. यामुळे दिल्लीच्या जामा मशिदीसह असंख्य मशिदी, दर्गे किंवा शिक्षणसंस्थांच्या जागांवर कज्जेदलाली सुरु होण्याचा धोका आहे. तूर्तास याबाबत निर्णय दिला जात नसला तरी जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेतल्याने एक मोठे दडपण कमी झाले आहे. हे प्रकरण सुनावणीस आले तेव्हाच प्रथमदर्शनी न्यायालयाने या तरतुदींबाबत साशंकता व्यक्त करून त्यांना स्थगिती देण्याचा कल बोलून दाखवला होता. आता या प्रकरणाची सुनावणी लवकर होऊन अंतिम आदेशही त्वरेने येईल अशी अपेक्षा करायला हवी. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. धर्मनिरपेक्ष म्हणजे सर्व धर्मांना समान वागणूक देणे, विशेषतः सरकारने सर्व धर्मांबाबत आपले धोरण सारखेच ठेवणे अपेक्षित आहे. पण भाजप सत्तेत आल्यापासून हा देश हिंदूंचा असून हिंदूंच्याच तंत्राने सर्व कारभार चालावा असे त्यांना वाटते. त्यातही मुस्लिमांना शत्रू मानून त्यांच्या धर्मात व कारभारात हस्तक्षेप करण्यात त्यांना अधिक रस आहे. पण न्यायालयाने तूर्त तरी याला फटकारले असून राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेचे तत्व उचलून धरले आहे.

## विचार

# भविष्यवेधी नियोजनाची गरज

***रिअल इस्टेट क्षेत्रातील संकटाबरोबरच बाजारात आत्मविश्वासाचा अभाव आणि देशांतर्गत अपुरी मागणी यामुळे हे क्षेत्र अपेक्षेप्रमाणे गती घेताना दिसत नाही. खड्डेयुक्त रस्ते, मालवाहतुकीचा मंदावलेला वेग, विजेचे प्रचंड दर, उदंड भ्रष्टाचार या त्रुटींवर आपण मात करु शकलेलो नाही. यामुळे निर्यातखर्च वाढतो आणि आपण स्पर्धेत टिकत नाही. हे दोष दूर करायचे तर भविष्यवेधी नियोजन व्हायला हवे.***



**महेश जोशी**

अलिकडच्या काळात जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजाराचे पडसाद भारतात त्वरीत उमटू लागले. २००८ मध्ये जागतिक मंदी आली, त्याचा फटका आपल्यालाही बसला. परंतु तेव्हा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी वेळीच दक्षता घेतल्यामुळे इथल्या बँका आणि वित्तीय क्षेत्रावर त्याचा भयंकर परिणाम होण्याचे टळले. मात्र गेल्या दशकभरात आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित अशा क्षेत्रांमधील भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीही घटली असल्याचे निरीक्षण जागतिक बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी नोंदवले. खरे तर चीनने रोजगारप्रधान उत्पादन क्षेत्रांमधून हळूहळू अंग कढून घेतल्यामुळे भारताला त्या क्षेत्रातील मालाची निर्यात वाढवण्याची उत्तम संधी प्राप्त झाली होती. परंतु ती भारताने साधली नसल्याचे जागतिक बँकेला वाटते.

वस्तुतः ॲपरेल, चर्मोद्योग, वस्त्रप्रावरणे आणि पादत्राणे या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. गेल्या काही काळात चीनमध्ये मजुरीचे दर वाढू लागल्यानंतर मात्र अनेक कंपन्यांनी या क्षेत्रातून माघार घेण्यास सुरुवात केली. त्याचा लाभ बांगलादेश, व्हिएतनाम, पोलंड, फ्रान्स या देशांनी घेतला आणि २०१५ ते २०२२ काळात जगाच्या व्यापारातील आपला या क्षेत्रातील हिस्सा वाढवला. उलट, वस्त्र, चर्मोद्योगच नव्हे, तर रत्न आणि आभूषणे आणि सागरी उत्पादने या मजूरप्रधान उद्योगांमधील भारताची निर्यात बारा टक्क्यांनी घसरली आहे. भारताची वस्त्रनिर्यात ३५ अब्ज डॉलर्सपर्यंतच कुंठित झाली आहे. उलट, मुक्त व्यापार करार करून तसेच अल्पविकसित देशाच्या दर्जाचा लाभ उठवून व्हिएतनाम आणि बांगलादेशने आपला बाजारहिस्सा वाढवून घेतला. २०२३-२४ मध्ये भारताची विकासगती ८.२ टक्के राहिली. त्यामुळे 'सर्वाधिक गतीने वाढणारा देश' म्हणून आपण ख्याती प्राप्त केली. असे असूनही शहरी तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर १७ टक्क्यांच्या आसपास असणे, ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे जागतिक मूल्यसाखळीत भारताची अर्थव्यवस्था अधिक प्रमाणात रुजवणे आवश्यक आहे. तसे झाल्यास, देशाला नवनवीन संधी प्राप्त होऊन बेकारांना नोकऱ्या मिळतील. त्यासाठी केंद्र सरकारला आपल्या निर्यात धोरणात बदल करावा लागेल. आयात-निर्यात अधिक सुरळीत आणि कमी खर्चात होईल, अशी धोरणे आखावी लागतील. भारताने विविध देशांशी मुक्त व्यापार करार केला असला, तरी त्यातून डिजिटल व्यापारासारखी क्षेत्रे वगळली असल्याचे सूक्ष्म निरीक्षण जागतिक बँकेने नोंदवले आहे.

अलिकडच्या काळात स्थिती वेगळी असली तरी गेल्या काही वर्षांमध्ये भारत आणि चीनचे संबंध विकोपाला गेले आणि भारताने चीनवर बहिष्काराचे अस्त्र उगारले. मागील काही वर्षांमध्ये भारत चीनकडून जेवढ्या मूल्याची एकूण आयात करत होता, त्याच्या केवळ एक पंचमांश मालाची निर्यात आपण चीनला केली आहे. चीनला भारताकडून दर वर्षी सरासरी १३ अब्ज डॉलर्स इतकी निर्यात केली जाते तर चीनकडून होणाऱ्या आयातीचे प्रमाण सुमारे ६६ अब्ज डॉलर्स इतके आहे. भारतातून चीनला सेंद्रिय रसायने, शुद्धीकृत तांबे, कापूस धागा, मिरी, वनस्पती तेल, मासे, मसाले, लोह खनिज, ग्रॅनाईट दगड आणि पेट्रोलियम उत्पादनांची निर्यात केली जाते तर चीनकडून भारतात मुख्यतः विद्युत यंत्रसामग्री आणि अन्य यांत्रिक साधनांची आयात केली जाते. पूर्वी भारतातून चीनला कॉपर कॅथड्सची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जात असे. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये ही स्थिती राहिलेली नाही. गेल्या वर्षी कापूस आणि कापूस धाग्याची निर्यातही मंदावली. भारत चीनकडून स्वयंचलित डेटा प्रोसेसिंग मशिन्स, दूरध्वनी सामग्री, व्हिडिओ फोन, इलेक्ट्रॉनिक सर्किट्स, ट्रान्झिस्टर, सेमिकंडक्टर डिव्हायसेस, प्रतिजैविके, खते, टीव्ही कॅमेरे, रेकॉर्डिंगची साधने, वाहनांचे घटक वगैरेंची आयात करू लागला. भारतात दूरसंचार क्रांती झाल्यामुळे चीनकडून मोठ्या प्रमाणावर दूरसंचार सामग्री आणि मोबाईल फोनची आयात होऊ लागली.

आता भारतात मोबाईल फोन्सचे अधिक उत्पादन होऊ लागले आहे. त्यामुळे आयात कमी झाली आहे. आजही भारत चीनला मुख्यतः कच्च्या मालाची निर्यात करतो. अर्थात अलीकडील काळात मूल्यवर्धित निर्यातही सुरू आहे. कर्करोगावरील औषधे, वाहनांचे घटक, प्रक्रियायुक्त खाद्यान्ने यांची निर्यात वाढू लागली आहे. ही स्वागतार्ह बाब मानली पाहिजे. पूर्वी भारत चीनला कच्चा कापूस निर्यात करत असे आणि कापसाचा धागा आयात करत असे. परंतु आजकाल आपण कापसाचा धागा आयात करण्याऐवजी निर्यात करू लागलो आहोत. चीनने आपला मोर्चा रोजगारप्रधान उद्योगांकडून मध्यम आणि उच्च तंत्रज्ञानयुक्त उद्योगांकडे वळवला आहे. त्यामुळे तो भारताकडून कापूस धागा आयात करू लागला आहे. इतरही काही उद्योगांसंदर्भात हीच बाब लागू पडते. १९व्या शतकात भारत ब्रिटिशांना कच्चा माल पुरवत होता. त्यावर प्रक्रिया करून ब्रिटिश भारताला तयार उत्पादने पाठवत. त्या काळात भारत कच्चा कापूस, नीळ, अफू, ताग, चहा, कच्चे चामडे या वस्तूंची निर्यात करत असे तर ब्रिटनमधून कापूस धागा, लोखंड आणि पोलाद उत्पादनांची आयात करत असे. वासाहतिक काळात ब्रिटन हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश होता. 'सेंटर फॉर इकॉनॉमिक स्टडीज अँड प्लॅनिंग' या दिल्लीस्थित संस्थेचे प्राध्यापक विश्वजित धर यांच्या मते भारत आणि चीनमधील सध्याचा व्यापार हा वासाहतिक काळासारखाच आहे.

चीनमध्ये प्रचंड उत्पादन होते. त्याची निर्यात जगाला केली जाते. भारताप्रमाणे ऑस्ट्रेलियाकडूनही चीन मोठ्या प्रमाणावर कच्चा माल आणि सामग्रीची आयात करत असतो. चीनमधून आलेल्या मालावर बहिष्कार घालण्याच्या कितीही गर्जना केल्या, चिनी ॲप्सवर बंदी घातली, तरीदेखील आजही जागतिक बाजारपेठेत चीन भारताच्या कित्येक कोस पुढे आहे. मात्र आज केवळ भारत-चीन संबंधांचा प्रश्न नसून चीनच्या पिछेहाटीचा योग्य तो फायदा उठवण्यात भारत कमी पडत आहे, हा आहे. वर्षभरापुर्वी जागतिक उत्पादनाचा दृष्टिकोन अंधःकारमय दिसत होता. त्याला चीनमधील उत्पादनही अपवाद नव्हते. अलिकडच्या काळातले गृहनिर्माण बाजारातील संकट, कमकुवत देशांतर्गत मागणी आणि उत्पादन जवळपासच्या प्रदेशात आणि स्वस्त ठिकाणी स्थलांतरित करण्याचा सततचा कल यामुळे निर्यात आणि देशांतर्गत मागणी कमी होत आहे. त्यामुळे चीनी उत्पादनावर दबाव येत आहे. 'इंटरॅक्ट ॲनॅलिसिस मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री' आउटपुट (एमआयओ) ट्रॅकर त्रैमासिक प्रकाशित केला जातो. तो वेगाने वाढणाऱ्या उत्पादन क्षेत्राबाबत महत्त्वाची अंतर्दृष्टी प्रदान करतो. अहवालात ४५ देशांमधील १०२ हून अधिक उद्योग आणि उप-उद्योगांचा समावेश असून पाच वर्षांच्या अंदाजासह १५ वर्षांचा ऐतिहासिक डेटा सादर केला गेला आहे.

ताज्या माहितीनुसार चीनमध्ये चलनविषयक आणि वित्तीय धोरणे प्रभावी होण्यास सुरुवात होईल आणि अधिक उत्तेजनात्मक उपाय अपेक्षित आहेत. तथापि, वाढ अजूनही कमकुवत आहे आणि येत्या काळात चीनचा 'एमआयओ' किंमतवाढीचा अंदाज तीन टक्क्यांवरून २.६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. हे चीनच्या उत्पादन उद्योगासाठी निराशाजनक आहे. पुढील काळात वाढीचा वेग वाढण्याची अपेक्षा आहे. रिअल इस्टेटच्या संकटाबरोबरच बाजारपेठेतील आत्मविश्वासाचा अभाव आणि देशांतर्गत अपुरी मागणी यांचाही चीनच्या उत्पादन उद्योगाच्या विकासावर परिणाम झाला आहे. कोरोनानंतरच्या तीन वर्षांमध्ये खासगी उद्योगांकडून आत्मविश्वास आणि गुंतवणुकीला फटका बसला आहे तर गेल्या दोन वर्षांमध्ये रोजगार, ग्राहकांचा आत्मविश्वास आणि शेअर बाजार या सर्व गोष्टी मंदावल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने फायदा उठवायला हवा होता; परंतु आशियातील अन्य छोट्या देशांनी फायदा उठवला असताना भारत अपयशी ठरला. भारतातील रस्ते खड्डेयुक्त असल्यामुळे कारखान्यांमधून बंदरांपर्यंतच्या मालवाहतुकीचा वेग मंद असतो. विजेचे दरही प्रचंड आहेत आणि ठिकठिकाणी उदंड भ्रष्टाचार आहे. यामुळे निर्यातखर्च वाढत असतो आणि स्पर्धेत आपला माल टिकत नाही.या त्रुटींसंदर्भात शासनाने पावले उचलणे आवश्यक आहे.

## चर्चा आजची

# पाकिस्तान क्रिकेट बोर्डचा उगाच नखरा

**संतोष राऊळ**

सध्या क्रिकेट विश्वात मोठी खळबळ चालू आहे. सध्या चर्चेचा विषय ठरत आहे तो पाकिस्तान संघ. त्यांची मजल सध्या आशिया चषकावरच बहिष्कार टाकण्यापर्यंत गेली आहे. त्याचे कारण ठरले ते सामना संपल्यावर भारतीय संघाने पाकिस्तानच्या खेळाडूंशी हात मिळवनी केली नाही ते. त्यामुळे क्रिकेट प्रेमींकडून भारतीय संघाच्या वागण्यापेक्षा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या वागण्यावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहेत. मुळात पाकिस्तानने वाद उगाच वाद उखरून काढण्याची गरजच नव्हती, त्यांचा हा उगाचचा नखरा त्यांनाच आता भारी पडत असल्याचे सर्व क्रीडा प्रेमींमधून बोलले जात आहे.

सध्या टी-२० प्रकारात आशिया चषक खेळवला जात आहे. हा चषक खेळवला जाण्याआधी देखील चषक चर्चेचा विषय ठरला होता. कारण या आशिया चषकाचे आयोजन पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने केले आहे. त्यामुळे हे सामने पाकिस्तानमध्ये होणार होते. परंतु, भारतीय बोर्डाने पाकिस्तानमध्ये सामना न खेळण्याचा निर्धार पक्का केला होता. त्यामुळे त्यावरही प्रचंड वादविवाद झाले. अखेर हे सामने दुबईत खेळविण्याच ठरले. या स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरूवात झाली. आणि ही स्पर्धा पुन्हा चर्चेत आली. कारण या स्पर्धेत पकिस्तान आणि भारत एकाच गटात ठेवण्यात आले होते. खरतर या सामन्यावर भारतीय संघाने बहिष्कार टाकण्याचे काही दिग्गज खेळाडूंसह राजकारणींकडून सांगण्यात आले होते. मात्र, तरीदेखील १४ सप्टेंबरला हा सामना खेळवला गेला. परंतु, या सामन्याला क्रिकेट प्रेमींचा पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. या सामन्यात भारताने एकतर्फी विजय मिळवला. पाकिस्तान वगळता भारत असलेल्या गटात कोणीही प्रतिस्पर्धी नाही.



परंतु, यावेळी पाकिस्तान संघ देखील स्वस्त्यात हरला. हा सामना संपल्यावर आपण का हरलो याचा शोध घेण्यापेक्षा भलत्याच वादाला त्यांनी तोंड फोडले.

खरंतर १४ सप्टेंबरचा सामना सुरू होण्याआधीच वादाला तोंड फुटले होते. कारण नाणेफेकीच्यावेळी भारताचा कर्णधार सुर्यकुमार यादवने पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगाह सोबत हात मिळवणी केली नव्हती. त्यानंतर सामना संपल्यावर देखील सुर्यकुमार यादवसह अन्य भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंशी हात मिळवणी केली नाही. त्यामुळे पाकिस्तान बोर्डाचा आणखीनच तिळपापड झाला. त्यांनी विनाकारण थेट सामना अधिकाऱ्यांना धारेवर धरले आणि वाद नको तेवढा वाढवला. त्यांनी सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांच्या विरोधात आयसीसीकडे तक्रार दाखल केली. इतकेच नाही, तर बुधवारी पार पडत असलेल्या सामन्यात जर अँडी पायक्रॉफ्ट हेच सामनाधिकारी असतील तर चषकावरच बहिष्कार टाकू, असा इशारीही त्यांनी दिला होता. यावर आयसीसीने पाकिस्तानलाच झटका दिला. आयसीसीने सांगितले की, नाणेफेकीच्या वेळी दोन्ही कर्णधारांमध्ये हस्तांदोलन होणार नाही, हे आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यानेच पायक्रॉफ्ट यांना सांगितलं होतं. त्यामुळे या वादाला पुर्णविराम मिळतोय तोच बुधवारी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाना युएई विरोधातील लढतीसाठी मैदानात न उतरण्याचे सांगितले होते. त्यामुळे नाणेफेकीची वेळ आली तरी ते बराच वेळ हॉटेलमध्येच थांबून होते. बराच वेळाने शेवटी आयसीसीने त्यांची समजूत काढल्यावर अखेर ते खेळण्यासाठी तयार झाले.

जर पाकिस्तान संघ हा सामना खेळले नसते तर त्यांच्यावर आशिया चषकातून बाहेर पडण्याची नामुष्की ओढावली असती. कारण बुधवारचा सामना हा त्यांच्यासाठी करो वा मरोचा सामना होता. त्याचबरोबर प्रचंड प्रमाणात आर्थिक तोटा सहन करावा लागला असता तो वेगळाच. त्यामुळे पाकिस्ताने स्वतःचेच हसू जगासमोर उघडे केले.

दरम्यान, अशी चर्चा होत आहे की, पाकिस्तान आणि भारत संघाला एका गटात ठेवणं हेच चुकीचं आहे. जरी पुढल्या फेरीत एकत्र खेळले असते तर तो वेगळा विषय ठरला असता. तेव्हा भारतीय खेळाडूंनी कदाचीत खिलाडी वृत्ती ठेवली असती. परंतु, प्रचंड प्रमाणात विरोध होत असतानाही एका संघात खेळवणं हे चुकीच ठरलं आहे. बीसीसीआयच्या दबावाखाली पाकिस्तान सोबत सामना खेळवला गेला असल्याची चर्चा देखील जोर धरत आहे. कारण भारत आणि पाकिस्तान विरोधातील सामन्यांत बीसीसीआयला मोठा फायदा असतो. परंतु, यावेळी पाहिजे तसा प्रतिसाद न मिळाल्याचे दिसत नाही. त्यात हस्तांदोलनाचा मुद्दा उगाच पाकिस्तानकडून खोदून काढला गेला असून त्यांची होती नव्हती ती इज्जत देखील त्यांनी गमावली असल्याचे क्रीडा प्रेमींमधून बोलले जात आहे.

## लोकसंसद

### मूर्ती कला एक जबाबदारी

काही दिवसांनी दुर्गा देवीचे नवरात्र सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर श्री दुर्गादेवीच्या मूर्तीची निर्मिती अंतिम टप्प्यावर आहे. मध्य प्रदेशातील भोपाळ येथे श्री दुर्गादेवीच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात बनवल्या जातात. गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक गणपती उत्सव व नवरात्र उत्सव यातील मूर्ती विविध रूपाच्या व आकाराच्या असतात. यावर्षी कृत्रिम बुद्धिमत्ते द्वारे बनविलेल्या श्री दुर्गादेवीच्या रूपानुसार बालिकेप्रमाणे दिसणाऱ्या देवीच्या मूर्तींना विशेष मागणी असल्याने मूर्तिकारांनी तशाच पद्धती च्या मूर्ती बनवण्याला प्राधान्य दिले आहे. हे बनवत असताना देवीच्या मूळ स्वरूपातच पालट करण्यात आला आहे. गणपती किंवा श्री दुर्गा देवी ह्या असुरांचा संहार करणाऱ्या देवता असल्याने मूळ स्वरूपाच्या मूर्ती बनवणे योग्य आहे. महिषासुराचे मर्दन करणारी, उग्र भाव असलेली श्री दुर्गा मातेची मूर्ती जितकी मारक तितकीच सज्जनांना अश्वस्त करणारी असते पण कलेच्या नावाखाली मूर्तीच्या मूळ स्वरूपात बदल करून देवीला शस्त्रहीन किंवा बालिकेच्या रूपात दाखविणे हे त्या देवतेचा अपमान करण्यासारखेच आहे. दहा हातात दहा शस्त्र घेतलेली श्री दुर्गादेवीची मूर्ती ही धर्मरक्षण, शक्ती आणि दृष्टांचा नाश यांचे प्रतीक आहे अशी मूर्ती पाहणाऱ्याच्या मनात संकटांशी सामना करण्याची शक्ती मिळते पण अन्य रुपात, वेशभूषेत असणारी, शस्त्रहीन मूर्ति ह्या कार्टून प्रमाणे वाटतात व त्यांचा तसा प्रभाव देखील नसतो. डिजिटल माध्यमाद्वारे बनवलेल्या अशा देवतांच्या चित्रांना डिजिटल अवतार असे म्हटले जाते. ही चित्रे सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात वायरल ही होतात त्यामुळे त्यांची मागणी वाढते. रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान या देशात श्री दुर्गादेवीच्या मूर्तीची मोठी मागणी असते. यंदा ए आय च्या माध्यमातून बनवलेले गेलेल्या चित्रानुसार बालिका रूपात बनवलेल्या मूर्ती च्या विक्रीत दुप्पट, तिप्पटीने वाढ झाली आहे. कोणतीही कला असो मग ती चित्रकलाअसो, मूर्ती कला असो, या द्वारे जे सादर केले जाते त्यात असणाऱ्या देवदेवतांचे तत्व तिथे कार्यरत होऊन ते बनवणाऱ्याला जसे मदत करते तसेच ते पाहणाऱ्यालाही मदत करते त्यामुळे मूर्तीचे किंवा चित्रातल्या देवदेवतांचे मूळ स्वरूप दाखवणे किंवा घडविणे हे जवाबदारीचे व जिकिरीचे काम आहे. ज्या कलेतून देवाची स्पंदने तुमच्या कडे येतात, देव तुमच्या कडे येतो तीच खरी कला आहे.

**- लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

## दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन

१८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन साजरा केला जातो. वेतनातील भेदभाव दूर करण्यासाठी समान वेतन आंतरराष्ट्रीय कोअलिशनने २०१९ मध्ये हा उपक्रम सुरू केला.

हा दिवस वांशिक महिला आणि इतर अल्पसंख्याकांवर होणाऱ्या वेतन तफावतीच्या परिणामांवर प्रकाश टाकतो. लिंग वेतन तफावत दूर करण्यासाठी संघटनांकडून अनेक प्रयत्न करूनही, अजूनही बरेच अमेरिकन लोक त्याची उपस्थिती मान्य करण्यास नकार देतात. यामुळे, व्यक्तींनी स्वतःला आणि त्यांच्या आसपासच्या लोकांना शिक्षित करणे आवश्यक आहे. जर मोठ्या संख्येने व्यक्ती ती ओळखण्यात अयशस्वी झाल्या तर समस्या सोडवणे आणखी कठीण होईल. नियुक्ती आणि पगार निश्चित करण्याच्या प्रक्रियेत, मुद्दाम किंवा अनावधानाने, भेदभाव आणि पक्षपात. महिला आणि पुरुष विविध उद्योग आणि भूमिकांमध्ये काम करतात, ज्यामध्ये उद्योग आणि नोकऱ्यांमध्ये प्रामुख्याने महिलांना कमी वेतन मिळते. काळजी घेणे आणि इतर जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी, विशेषतः उच्च-स्तरीय पदांवर, कामाच्या ठिकाणी अपुरी लवचिकता. महिला पुरुषांपेक्षा जास्त दराने अर्धवेळ काम करत आहेत. काळजी घेण्याच्या कामासाठी कामापासून दूर जास्त वेळ घालवल्याने महिलांच्या करिअरच्या प्रगतीवर आणि संधींवर परिणाम होत आहे. महिलांवर बिनपगारी काळजी आणि घरातील जबाबदाऱ्यांचा मोठा भार. सुरक्षित आणि विश्वासार्ह वाहतुकीचा अभाव, ज्यामुळे कामाच्या ठिकाणी पोहोचण्याची त्यांची क्षमता मर्यादित होऊ शकते. ओव्हरटाईम किंवा रात्रीच्या शिफ्टसारखे अनियमित तास काम करण्यास असमर्थता. महिला जागतिक लोकसंख्येच्या अर्ध्या लोकसंख्येचा भाग आहेत आणि म्हणूनच त्यांच्याकडे अर्धी क्षमता आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते, लैंगिक समानता हा केवळ एक मूलभूत मानवी हक्क नाही तर शांततापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी, मानवी क्षमता वाढवण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी देखील महत्त्वाचा आहे. तरीही, संपूर्ण लिंग समानता साध्य करण्यासाठी अजूनही मोठ्या प्रमाणात प्रयत्नांची आवश्यकता आहे, अहवालात असे सूचित केले आहे की महिला आणि पुरुषांमध्ये पूर्ण समानता साध्य करण्यासाठी १३१ वर्षे लागतील. हे पाच पिढ्यांइतके आहे, जे २०३० च्या शाश्वत विकास ध्येय च्या लक्ष्याच्या पलीकडे २१५८ पर्यंत विस्तारते.


कोणत्याही राष्ट्राने पूर्ण लैंगिक समानता गाठलेली नसली तरी, आइसलँड ही जगातील अव्वल अर्थव्यवस्था म्हणून वेगळी ओळख निर्माण करते, ९३.५% लैंगिक तफावत कमी करण्यात यशस्वी झाली आहे आणि पंधरा वर्षांहून अधिक काळ जागतिक क्रमवारीत आघाडीचे स्थान राखले आहे. भारतात, महिलांच्या आर्थिक सहभाग आणि संधींमध्ये किंचित सुधारणा झाली आहे, राजकीय सक्षमीकरणात त्यांची कामगिरी इतर निर्देशकांच्या तुलनेत तुलनेने ६५ व्या स्थानावर आहे. तरीही, दक्षिण आशियातील एकूण परिस्थिती चिंताजनक आहे, २०२४ मध्ये भारताने लिंगभेदाच्या केवळ ६४.१% पर्यंतच मर्यादा ओलांडली आहे, १२९ व्या क्रमांकावर आहे, जो २०२३ च्या १२७ व्या स्थानापेक्षा थोडा खाली आहे, आणि फक्त मालदीव आणि पाकिस्तानपेक्षा पुढे आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१८ सप्टेंबर**

१)श्री.हरिश्चंद्र लक्ष्मण कोळी मु.वरसोली, अलिबाग, दि.१८-०९-१९३०
२)श्री.सुहास शांताराम मयेकर चेंढरे, अलिबाग दि.१८-०९-१९५०
३)श्री.सुधीर केशव क्षीरसागर वरसोली, अलिबाग दि.१८-०९-१९५०
४)श्री.चंद्रकांत मोरारजी गडा अलिबाग दि.१८-०९-१९२७
५)श्रीम.मालती मधुकर साळवी अलिबाग, दि.१८-०९-१९४९
६)श्रीम.सरस्वती गणपत थळे इस्त्राईल आळी, अलिबाग दि.१८-०९-१९४७

## सुवर्णकण



जग हे अनंत वेगवेगळ्या वृत्तीने भरलेले आहे त्यामधील संघर्षामुळे आपण कधीच सुखी होणार नाही

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## निसर्गानुभव कार्यशाळेचे आयोजन

**माणगाव** : माणगाव तालुक्यातील वडघर येथील साने गुरुजीराष्ट्रीयस्मारकयेथेजैवविविधता संवर्धन संशोधन केंद्रातर्फे दि.२७ व २८ सप्टेंबर रोजी निसर्गानुभव कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा उद्देश निसर्ग सहवासातून आनंद मिळविणे, कोकणच्या निसर्गाकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून पहायला शिकणे, जैवविविधता या संकल्पनेची ओळख करुन घेणे, पर्यावरण जतन व संवर्धनाबद्दल विचार करणे हा आहे. या कार्यशाळेत परिसर भ्रमंती, वृक्ष वेली, प्राणी पक्षी यांची ओळख, निसर्ग खेळ उपक्रम, जैवविविधता व माणूस यातील संबंध, पर्यावरण-संगीत पर्यावरणाचे जतन संवर्धन, माहितीपट प्रदर्शन, चर्चा व गप्पांचा समावेश आहे. १२ ते ५५ वयोगटासाठी खुल्या असलेल्या या कार्यशाळेचे प्रवेश नाममात्र शुल्क व मर्यादित जागा असलेल्या या निसर्गानुभव कार्यशाळेची नोंदणीसाठी स्मारक कार्यालय ७७७६९३७८४४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# पोस्ट ऑफिस इमारत धोकादायक

**● भिंतीना तडे, दरवाजे-खिडक्यांना गंज; प्लास्टर कोसळण्याच्या स्थितीत**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ खांडा येथे तालुक्यातील सर्वात मोठे ओळखले जाणारे नेरळ पोस्ट ऑफिस अक्षरशः धोकादायक अवस्थेत आहे. पावसाळ्यात छप्पर आणि भिंतींमधून पाणी पाझरत असून, भिंतींना मोठमोठे तडे गेले आहेत. दरवाजे-खिडक्या कुजून गंजल्या आहेत. कुठल्याही क्षणी प्लास्टर कोसळेल, अशी भीती आहे.

दररोज बँकिंग, टपाल, विमा, मनीऑर्डरसाठी येणाऱ्या हजारो ग्राहकांना आणि कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. त्यामुळे या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम ठाकरे शिवसेनेच्या महिला आघाडीकडून उपशहर संघटिका प्राची मनवे यांनी केला.

नेरळ पोस्ट ऑफिस कार्यालयाबाबत नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही



प्रशासनाकडून आजपर्यंत कोणतीही दुरुस्तीची ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे. इंटरनेट सेवादेखील गेल्या महिनाभरापासून बंद असल्याने खातेदारांना सतत अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

इमारतीला चारही बाजूंनी तडे गेले आहेत. सर्वत्र पाणी गळत आहे. नागरिक व कर्मचारी यांचा जीव धोक्यात आहे आणि प्रशासन हातावर हात धरून मूग गिळून गप्प बसले आहेत. जुन्या इमारती कोसळण्याच्या घटना सातत्याने डोळ्यासमोर असताना न जाणो एका दिवसात ही इमारत कोसळली, तर जबाबदार कोण? येथे विद्युत वायर शॉर्टसर्किट होऊन दुर्घटना देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर वेळीच दुरुस्ती झाली नाही, तर शिवसेना महिला आघाडी थेट पोस्ट ऑफिसवर मोर्चा काढावा लागेल, असा ईशारा देण्यात आला आहे.

### प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास आंदोलन

येथील कर्मचारी वरिष्ठांच्या दबावामुळे बोलण्यास तयार नाहीत. लोक प्रतिनिधींचे देखील याकडे लक्ष नाही. त्यामुळे स्थानिकांमध्ये रोष वाढत आहे. प्रशासनाने तातडीने इमारतीची दुरुस्ती व पर्यायी व्यवस्था केली नाही, तर शिवसेनेच्या आक्रमक आंदोलनाचा प्रशासनाला सामना करावा लागणार आहे.

> **नेरळ येथील पोस्ट ऑफिसमध्ये नेहमीच इंटरनेट सेवा सुरलीत नसल्यामुळे गरीब खातेदारांना दररोज हेलपाटे मारावे लागत आहेत. इमारतीची तर अत्यंत दयनीय अवस्था आहे. कधीही इमारतीचा भाग कोसळू शकतो अशी अवस्था झाली आहे. परंतु, प्रशासन मात्र ढिम्म आहे. प्रशासनाने तात्काळ दुरूती करावी. दुरूती झाली नाही तर लवकरच थेट पोस्ट ऑफिसवर मोर्चा काढू.**
> **- प्राची मनवे, महिला उपशहर संघटिका, शिवसेना (ठाकरे गट)**

# शासन निर्णयाविरोधात मुरुड तालुका आक्रमक

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मूरूड तालुका कुणबी समाजोन्नती संघ मुंबई व मूरूडच्या वतीने मुरुड नायब तहसीलदार संजय तवर यांच्याकडे आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

सोमवारी (दि.१५) सकाळी मूरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील राजे शिवछत्रपती महाराजांना पूष्पहार अर्पण करून तद्नंतर तहसीलदार कार्यालयाजवळ महिलांसह शेकडो कार्यकर्ते राज्य सरकारच्या विरोधात आक्रमक झाले. यावेळी याठिकाणी मुरूड पोलीस ठाण्याच्या पोलीस



कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या निवदेनात म्हटले आहे की, हैद्राबाद गॅझेटीअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबतचा जीआर म्हणजे ओबीसींचे आरक्षण संपविण्याचा सरकारचा कट आहे. हा जीआर मागे घेण्यात यावा. मराठा समाजाचा कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ओबीसीमध्ये समावेश करण्यास आमचा ठाम विरोध आहे.

तसेच, ओबीसी विद्यार्थ्यांना महाज्योतीची सरसकट शिष्यवृत्ती लागू करावी, पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात यावे आणि रिक्त पदांचा अनुशेष भरण्यात यावा, तसेच ओबीसींचे अनेक शैक्षणिक, नोकरी विषयक व स्वयंरोजगार विषयक गंभीर प्रश्न प्रलंबित आहेत. याकडे राज्य सरकार दुर्दैवाने दुर्लक्ष करीत आहे. या उपरोक्त मागण्यांवर राज्यशासनाने येत्या १५ दिवसांत निर्णय न घेतल्यास संघटनेच्या वतीने अखंड कोकणामध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, याची आपण गांभीर्याने दाखल घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

## शाळेत ग्रीन कलर डे साजरा

**माणगाव** : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ग्रीन कलर डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृती सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यातील काही कलाकृती थक्क करणाऱ्या होत्या. हिरवा रंग हा निष्ठा, सुख, समृद्धी आणि प्रगती यांचे प्रतीक आहे. तसेच हिरवा रंग हा निसर्ग आणि भूमीशी आपले नाते दर्शवितो. हिरव्या रंगाचे महत्व कळावे यासाठी प्रयत्न करण्यात आला होता.

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ श्री बापूसाहेब विसपुते कॉलेज नवीन पनवेल येथे पार पडला.

मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन तसेच सीकेटी इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूलमधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या गुणगौरव सोहळ्यामध्ये गणित संबोध परीक्षा इयत्ता पाचवी व आठवीसाठी एकूण २१० मेडल व सर्टिफिकेटचे वाटप करण्यात आले. गणित प्राविण्य परीक्षा व प्रज्ञा परीक्षा यामधील विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल व सर्टिफिकेट मंडळाकडून देण्यात आले. यावर्षी म. ना. नेने कन्या विद्यालय पेण येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी रिद्धी सुनील मनोहर हिने महाराष्ट्र राज्यात २३ वा क्रमांक पटकावला. तिला शिष्यवृत्ती म्हणून रोख रक्कम १५०० रुपये, ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावीतील गणित पारंगत परीक्षेतील जिल्ह्यातील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी यांचाही सर्टिफिकेट व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

## दुर्गा मातेच्या मूर्ती घडविण्यात कारागीर मग्न

**। उरण । प्रतिनिधी ।**

गणेश उत्सवानंतर सर्वांना वेध लागले आहेत ते नवरात्रोत्सवाचे. सोमवार दि.२२ रोजी घटस्थापना असल्याने नवरात्रोत्सवासाठी थोडेच दिवस आहेत. त्यामुळे मूर्तिकार दुर्गामातेच्या मूर्ती बनविण्यात मग्न झाले आहेत.

उरण तालुक्यातील चिरनेर येथील कला नगरी तसेच शहरातील मुळेखंड, सोनारी, बोकडवीरा, करंजा आदी ठिकाणी मातीचे गणपती बनविणारे कारखाने आहेत.

उरण शहरातील गणपती व दुर्गा मातेच्या मूर्ती बनविणारे कारागीर कमी झाले आहेत. सध्या प्लास्टर



ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविल्या जातात. वेळ कमी लागतो, खर्च कमी येतो, बनविणेही सोपे जाते. त्यामुळे शाडूच्या मातीने मूर्ती बनविणारे कारागीर कमी मिळतात ही खंत आहे.

> **उरण शहरातील मुळेखंड येथे आमचा मूर्ती बनविण्याचा कारखाना आहे. दरवर्षी ३५० मूर्ती व १६ देवींच्या मूर्ती बनवितो. यंदाचे ६५ वे वषे आहे. येत्या काही महिन्यात नत्र मूर्ती कला वर्कशॉप सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे मातीपासून मूर्ती बनविणाऱ्या कारागीरांची संख्या वाढेल, तरुण पिढीला आनंद वाटेल, त्यातून आवड निर्माण होईलआणि अनेक मूर्तिकार तयार होतील.**
> **- सचिन कडू, मूर्तिकार**

## समाजाला पतसंस्थेची आवश्यकता: सचिन बच्छाव



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आज समाजाला सामाजिक हीत जपणाऱ्या पतसंस्थेची आवश्यकता आहे. ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काही तरी देणे लागतो, ही उदांत भूमिका घेऊन कार्य करणाऱ्या पतसंस्था आजही कार्यरत आहेत. आर्थिक क्षेत्रात काम करत असतानादेखील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था ही खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे हित पाहणारी पतसंस्था आहे, असे प्रतिपादन मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले आहे.

यावेळी मुरुड शहरातील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेकडून मुरुड नगरपरिषदेच्या सहा मराठी शाळेतील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहिली ते चौथीमधील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप केले. इयत्ता पाचवी ते सातवी कॅमलिन कंपास बॉक्सचे (१०० बॉक्स) वाटप करण्यात आले. तर नगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या सहा शाळांना ग्रीन बोर्ड वाटप करण्यात आले.

## तळवडे गावाच्या राजाला निरोप

नेरळ : कर्जत तालुक्यातील तळवडे गावातील खाडे कुटुंबाला अनेक व्याधींनी ग्रासले होते. त्यामुळे तुकाराम गणपत खाडे यांनी भाद्रपद महिन्यात गणेश उत्सव सुरु असताना बाप्पाला नवस केला. त्यानंतर खाडे कुटुंबाला हा बाप्पा पावला आणि त्यांच्या सर्व व्याधी दूर झाल्या. त्यामुळे तळवडे गावाचा राजा म्हणून बाप्पाचा हा सण खाडे कुटुंबीय २१ दिवस साजरा करतात. २१ दिवसांनी मंगळवारी भक्तांच्या उपस्थित तळवडे गावातून तलावापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर भक्तिभावाने बाप्पाला निरोप देण्यात आला.



## मराठा आरक्षणाविरोधात निवेदन

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

सरकारने मराठा समाजाला कुणबी दाखले देऊन त्यांना ओबीसीमध्ये घ्यावे यासाठी जीआर काढला आहे. सरकारने हा जीआर ताबडतोब रद्द करावा. तसेच, विविध मागण्यांसाठी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली कुणबी समाजोन्नती संघ मुंबईतर्फे ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनातून जिल्ह्यातील स्थानिक पातळीवरून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना तहसीलदार यांच्यामार्फत मराठा आरक्षणाच्या विरोधात रायगड कुणबी समाजाच्या वतीने हैदराबाद गॅझेट जीआर रद्द व इतर विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते. याच अनुषंगाने बुधवारी (दि.१७) रायगड जिल्हा कुणबी समाजोन्नती संघाच्या वतीने जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन देण्यात आले असून जिल्हाधिकारी यांच्या वतीने तहसीलदार चंद्रसेन पवार यांनी ते स्वीकारले.

## हिंदी दिवस उत्साहात साजरा

**आगरदांडा** : कोकण उन्नती मित्र मंडळाचे मुरूड वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात जंजिरा येथील हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस साजरा करण्यात आला. यात्रसंगी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केली तर काही विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच राज भाषा हिंदी या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनदेखील करण्यात आले होते. यात अरफात सिरसीकर प्रथम, अंतरा मसाला द्वितीय, रीदा किल्लेकर आणि अल्मिरा घारे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. तसेच काव्यवाचन स्पर्धेमध्ये राज पवार प्रथम, फिजा जामदार द्वितीय, अरफात शिरसीकर तृतीय, आणि अंतरा मसाल उत्तेजनार्थ ठरले.

**ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर | वशेणी गावातील महिला उतरल्या रस्त्यावर**

# दारु बंदीसाठी नारीशक्ती एकवटली

**। उरण । प्रतिनिधी ।**

घरातील तरुण, लहान मुले दारूच्या आहारी गेल्यामुळे वशेणी गावातील महिलांनीच दारु बंदीसाठी आक्रमक भूमिका घेतली. वशेणी या गावात महिलांनी दारूचे दुकाने बंद करावीत या मागणीकरता ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर केला. तसेच वशेणी गावात दारूबंदी व लग्न समारंभातील हळदीच्या साड्या बंद करण्यासाठी जनजागृती मोहीम म्हणून चक्क महिला बुधवारी रस्त्यावर उतरल्या होत्या.

उरण तालुक्यातील वशेणी गावातील अवैध धंदे आणि दारूचे दुकाने बंद करावेत यासाठी महिला




आणि ग्रामस्थांनी पोलिसांकडे मागणी केली. मात्र या गंभीर गोष्टीकडे गावातील पोलीस पाटील तसेच पोलीस प्रशासन लक्ष देत नसल्यामुळे अबालवृद्ध विशेष करून तरुण मुले हे व्यसनाच्या आहारी गेलेत. त्यामुळे गावातील शांतता भंग झाली आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन वारंवार वाद-विवाद होत आहेत. एकंदरीत संसाराची होणारी राख रांगोळी आणि सतत होणारे वाद यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी महिलांनी आक्रमक भूमिका बजावली.

वशेणी ग्रामपंचायतीच्या सरपंच अनामिका हितेंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रजा बळीराम पाटील, ग्रामपंचायत अधिकारी विद्या भाटकर तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थित ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी (दि.१६) एकमताने ग्रामसभेत दारुबंदीसाठी ठराव मंजूर करुन घेतला आहे.

दारू बंदीसाठी व लग्न समारंभातील हळदीच्या साड्या बंद करण्यासाठी वशेणी गावातील महिलांनी बुधवारी (दि.१७) गावात जनजागृती संदर्भात रॅलीचे आयोजन केले होते. तसेच, जोपर्यंत ही दारु बंद होत नाही, तोपर्यंत जनजागृती सुरूच राहील अशी भूमिका महिला व ग्रामस्थांनी घेतली आहे.

> वशेणी येथे गेल्या काही वर्षांपासून गावठी दारू विक्री खुलेआम सुरू आहे. गावातील लहान बालक तसेच तरुण वर्गाला दारूचे व्यसन लागले असून काहींचे संसार मोडले आहेत. यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेतला आहे. तसेच लग्न समारंभातील हळदीच्या साड्यावर वारेमाप होणारा खर्च टाळण्यासाठी पडलेली साड्यांची प्रथा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
> - अनामिका हितेंद्र म्हात्रे, सरपंच, वशेणी ग्रामपंचायत

# निवडक



## चैत्य परिपाठी कार्यक्रम उत्साहात

**म्हसळा** : अमृतेश्वर (देवघर) येथे म्हसळा जैन समाजातर्फे चैत्यपरिपाठी कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि उत्साहात पार पडला. पहाटे श्री अमृतेश्वर शंकर महाराजाना सर्व जैन बांधवांकडून अभिषेक घालून विधिव्रत पूजा करण्यात आली. तसेच जैन भगिनींकडून स्नात्रपूजा करुन मोठ्या भक्तीभावाने श्री पार्श्वनाथ पंचकल्याणक पूजा करून आरती मंगलदिवे आणि शांती कलश लाभर्थियांनी केले. पर्वपर्युषणमध्ये ज्या भगिनींनी दहा दिवस उपवास केले, त्या भगिनींचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व समाज बांधवांना महाप्रसाद देण्यात आला. याप्रसंगी दिपचंद जैन, कांतीलाल जैन, रमेश जैन, अशोक जैन, सुरेश जैन, राजेश जैन, रणजित जैन, ललित जैन, तेजपाल जैन, खेतल जैन, महावीर जैन, राहुल जैन, हितेश जैन, विनोद ओसवाल आणि समाजातील सर्व बंधू, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आयुष्य हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी सुविधा उपलब्ध

**कोर्लई** : ॲल्टस गुड हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड संचलित मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष्य हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या सेवेचा तालुक्यातील तसेच आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुष्य हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. नूतन माळी व डॉ. स्नेहा माळी-फासे यांनी केले आहे. नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील रुग्णांना आवश्यक अशा सोनोग्राफीसाठी यापूर्वी अलिबाग, पेण, मुंबई येथे जावे लागत होते. याठिकाणी सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याने गरोदर माता, हृदय २ डी पोटाची व किडणी तपासणी करण्यात येऊन अत्यल्प दरात आधुनिक उपचार करण्यात येणार आहेत. यावेळी आयुष्य हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. नूतन माळी, डॉ. स्नेहा माळी-फासे, रामलिंग माळी, हृदयरोग तज्ञ डॉ. शिवशरण भारत, डॉ. राजेंद्र शितोळे उपस्थित होते.

## २१ दिवसांच्या गणरायाला निरोप

**आगरदांडा** : मुरूड पोलीस ठाणे हद्दीतील २१ दिवसांच्या गणपती बाप्पाला ढोलताशांच्या गजरात निरोप देण्यात आला. यावेळी समुद्रकिनाऱ्यापर्यंत फटाक्यांची आतिषबाजी करत नाचत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. २१ दिवसांचे मुरूड शहरात ४ तर ग्रामीण भागात ११ घरगुती गणपती बाप्पा विराजमान झाले होते. मंगळवारी गणरायाला २१ दिवस पूर्ण झाल्याने रात्रीच्या वेळी विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश रसळे, पोलीस शिपाई व महिला पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## कोकण ज्ञानपीठात विद्यार्थी संवाद

**उरण** : महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र करिअर कट्टा आणि कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि.१७) करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये करिअर कट्टाचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल किती वापरावा, आई-वडिलांबरोबर तसेच शिक्षकांबरोबर, मित्रांमध्ये संवाद कसा असावा, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच व्यक्तिमत्व विकास कसे घडवावे, रोजगाराच्या संधी कशा मिळव्यात, व्यवसाय कसा निवडावा, या सर्व विविध घटकांविषयी उद्बोधक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला डॉ. पी आर कारुळकर, डॉ. अरुण चव्हाण, डॉ. एम जी लोणे, डॉ. अनुपमा कांबळे, प्रा.थावरे, प्रा. रियाज पठाण, प्रा. हन्नत शेख, प्रा. विनिता तांडेल तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## प्रबोधनकार ठाकरे जयंती उत्साहात

**म्हसळा** : म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागांतर्गत महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलालाही वळण लावणारे रायगड जिल्ह्याचे सुपुत्र कै. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी भुषविले. तर अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. शिरीष समेळ यांनी प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. महाविद्यालयातील ग्रंथपाल आणि सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. आर.एस. माशाले यांनी प्रबोधनकारांच्या जीवनावर मनोगत व्यक्त करताना कै. केशवराव ठाकरे यांना प्रबोधनकार ही उपाधी कशी मिळाली याबाबतीत विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील एन.एस.एस. आणि डि.एल.ई. विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. तसेच, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

## निवडक



### शासन निर्णयाविरोधात निदर्शने

**महाड :** हैद्राबाद गॅझेटनुसार काढलेल्या शासन निर्णयाविरोधात ओबीसी समाजाने महाड-पोलादपूरमध्ये आक्रोश व्यक्त करत जोरदार निदर्शने केली. कुणबी दाखल्यावरून मराठा समाजाची ओबीसीमधील घुसखोरी थांबवावी, ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचवावे, सर्व समाजाची जातनिहाय जनगणना करावी तसेच इतर २४ मागण्यांसाठी काल, सोमवारी महाड शहरातील छ. शिवाजी महाराज चौकात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे अभिवादन करून निदर्शनास प्रारंभ झाला. यावेळी महाड व पोलादपूर तहसील कार्यालयासमोर मोर्चा काढून तहसीलदारांना २४ मागण्यांचे निवेदन देण्यात आले. कुणबी समाजोन्नती संघ मुंबई, कुणबी समाज उन्नती मंडळ आणि कोकणातील सर्व तहसील कार्यालयांसमोर निदर्शने करून शासन निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात आली. राज्य सरकारच्या विरोधात ओबीसींचा आक्रोश स्पष्टपणे दिसून आला. या निदर्शनाला कुणबी समाजोन्नती संघाचे सहसचिव संजय उमासरे, महाड-पोलादपूर शाखा अध्यक्ष सत्यवान यादव, कुणबी समाज उन्नती मंडळाचे प्रदीप लोखंडे, सुभाष लाले, विशाल गोलांबडे यांच्यासह शेकडो समाजबांधव व महिलावर्ग उपस्थित होते. तालुक्यातील अनेक ओबीसी संघटनांनीही मोर्चाला पाठिंबा दर्शविला.



### शेतकऱ्यांना बांबू रोपांचे वाटप

**चिरनेर :** बांबू लागवड मोठ्या प्रमाणात होणे ही काळाची गरज आहे. यासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या असून, शेतकऱ्यांनी त्याचा उचित फायदा घ्यावा. असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. तालुक्यातील चिरनेर, नागाव, वशेणी, आवरे, विंधणे, वेश्वी तसेच अन्य गावातील शेतकऱ्यांना १४०० च्या आसपास रोपांचे वाटप करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनात हातभार लागावा, यासाठी शेतकऱ्यांना बांबू रोपांचे वाटप करण्यात आले आहे. याप्रसंगी कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत, भजनावळे, अलका बुरकुल, प्रफुल्ल खारपाटील, महेंद्र मोकल, दत्तात्रेय म्हात्रे, अविनाश पाटील, शशिकांत पाटील, विजय म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, अभिजीत केणी तसेच अन्य शेतकरी उपस्थित होते.

### आगरी-कोळी संग्रहालयाचा वनवास संपेना

**उरण :** सिडकोने नवी मुंबई शहर हे आगरी-कोळी समाजाच्या जमिनीवर उभारले. या समाजाच्या संस्कृतीचे जतन व्हावे, परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने नेरुळ सेक्टर २४ येथे आगरी-कोळी संस्कृती भवन उभारण्यात आले. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर समाजाच्या संस्कृतीचा वारसा जपणारे संग्रहालय उभारण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र लोकार्पणाला तब्बल १४ वर्षे उलटूनही संग्रहालय सुरू झालेले नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सन २०११ मध्ये या इमारतीचे लोकार्पण झाले. समाजातील विवाहसोहळे व विविध कार्यक्रमांसाठी दुसऱ्या-तिसऱ्या मजल्यावर सभागृहे उपलब्ध करून दिली असली, तरी पहिल्या मजल्यावरचे संग्रहालय आजही कागदोपत्रीच आहे. १४ वर्षे झाली तरी या संग्रहालयाचा मुहूर्त लागत नाही, अशी खंत समाजबांधव व प्रकल्पग्रस्त व्यक्त करीत आहेत. आगरी-कोळी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या संग्रहालयाकडे सिडकोने कायमच दुर्लक्ष केले आहे. इमारतीच्या देखभाल-दुरुस्तीवर देखील दुर्लक्ष होत आहे.


## क्लासिफाईड्स
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- ''जन्नावर हॉस्पीटल'' अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स Private Nursing Course. ३) मुले/मुली १२ वी पास. ४) X-Ray साठी मुले, ५) मावशी/आयाबाई, ६) रिसेप्शनिस्ट. आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग, ७७४५०५००२५, ९११९५६५०२२, ९३२१३०३९३८
- Job Opening – Restaurant Manager Burgers & Booch, Ranjanpada, Alibaug Requirements : English & Hindi (spoken/written), computer skills, college degree (freshers welcome). Salary : ₹15,000/month → ₹18,000 after 3 months + tips/service charge (₹3,000–₹8,000). Accomodation & meals provided, weekly off (Tuesday). Timing: 12 AM – 11 PM. Whatsapp 7506954611 to apply.
- जुन्या चांगल्या कंडिशनच्या वापरत्या मोटर साईकल कम स्कुटर योग्य भावात विकत मिळतील. दुकान कामासाठी मुलगा पाहिजे. योग्य वेतन मिळेल. मो. ९१४६९२३३९५, ७६६६४६६८६६
- भारत पेट्रोल पंप चेंढरे अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत. ७४४७४०४४११/९४२३८५४८७०
- पाहिजेत : अलिबागमधील नामांकित ऑफिसकरीता पदवीधर मुलगा/मुलगी भरणे आहे. संपर्क : ९९२३७५०५४९, ९४२२३८३०९९
- नारळ किंवा नारळाचे गोटे पाहिजेत. ७०६६१३८३६८
- व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी भागीदार पाहिजे. ७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# महाडच्या उत्पादन शुल्क कार्यालयाला टाळे

## अनधिकृत दारू विक्रीचा धुमाकूळ; पोस्टमनसुद्धा बुचकाळ्यात

| महाड | प्रतिनिधी |

**संपूर्ण राज्यासह महाड-पोलादपूर तालुक्यांतील बारचालक व परमीट रुम परवानाधारक हॉटेल व्यावसायिकांमध्ये व्हॅट, उत्पादन शुल्क आणि परवाना शुल्कात १५ टक्क्यांपर्यंत झालेल्या वाढीमुळे संताप व्यक्त होत आहे.**

तर दुसरीकडे ठराविक बिअर शॉपी, चायनिज हॉटेल्स व ढाब्यांवर अनधिकृतरित्या मद्यविक्री व मद्य पिण्यासाठी बैठक व्यवस्था केली जात आहे. तालुक्यातील अनेक गांवामध्ये बेकायदेशीररित्या मद्य विक्री देखील होत आहे. अशी भयानक परिस्थिती असताना महाड उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी मात्र कारवाई कोणतीही ठोस कारवाई करण्याऐवजी कार्यालयीन वेळेत कार्यालयाला चक्क कुलूपबंद करुन गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मंगळवारी दुपारी महाड शहरातील नवेनगर येथे असलेल्या राज्य उत्पादन शुल्क कार्यालयालाच चक्क टाळे लागलेले असून शासकीय टपाल घेऊन आलेल्या पोस्टमनलाही टपाल बंद दरवाज्याखालून टाकण्याची वेळ आली. हा प्रकार महाडमधील काही पत्रकार कार्यालयात माहिती घेण्याकरीता गेले असताना निदर्शनास आल्याने एकच खळबळ उडाली आहे.



महाड हा ऐतिहासिक वारसा लाभलेला तालुका असून महाड शहरात फक्त दोनच परवाना असलेली वाईन शॉप्स आहेत. या दुकानांमधून विक्री होणारी सर्व प्रकारची मद्ये गावोगावी नेली जात असून तालुक्यात असंख्य अनधिकृत दारू अड्डे फोफावले आहेत. परिणामी, तरुणवर्ग मोठ्या प्रमाणावर दारूच्या आहारी गेला आहे. तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाईचा अभाव असल्याने स्थानिकांमध्ये संताप पसरला आहे.

त्यातच कार्यालयीन वेळेत शासकीय कार्यालयालाच टाळे लावून अधिकारी व कर्मचारी नेमके कोणत्या अशा कामगिरीवर गेले होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हा प्रकार गंभीर मानला जात असून सुज्ञ नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

याबाबत महाराष्ट्र राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तक्रार करणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिक पत्रकारांनी व्यक्त केली आहे.

### उडवाउडवीची उत्तरे

**महाड उत्पादन शुल्क कार्यालयाचे उप निरिक्षक रश्मिन समेळ यांच्याशी याप्रकरणी संपर्क केला असता, ते पूर्णत: गोंधळले आणि त्यांनी आमच्या साहेबांशी बोलतो असे सांगत आपल्या वरिष्ठांकडे फोन दिल्यावर त्यांनी देखील उडवाउडवीची उत्तरे देत फोन कट केला.**

## आरोग्य शिबिराचे आयोजन

| कोर्लई | प्रतिनिधी |

शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दि.१७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर या कालावधीत महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंबाच्या, समाजाच्या तसेच संपूर्ण देशाच्या प्रगतीसाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे अभियान आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आले असून त्याचाच भाग दि.२३ सप्टेंबर रोजी मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा तालुक्यातील महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. उषा चोले यांनी केले आहे. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील डॉ. मंगेश पाटील, डॉ. मेघराज दावे, डॉ. अजय इंगळे, डॉ.हर्ष गुजराथी, डॉ. शेखर वानखेडे, डॉ. हेतल गांधी, डॉ. कीस्तुक ससाने, डॉ. निधी लाहोटी, डॉ. कोस्तूक दास, सुहास सानप, सचिन अडसुलवाल, शालीकराव पवार, अतुल शेडगे, पुजा तोडले, श्रुतीका कांबळे, सिमा रेजा उपस्थित राहणार आहेत.



मुरूडला पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. सुंदर समुद्रकिनारा नारळ-सुपारीची झाड पर्यटकांची वाट पाहत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## कोमसापकडून गुणवंतांचा सन्मान

| माणगाव | प्रतिनिधी |

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळातर्फे रविवार (दि.१४) सप्टेंबर रोजी राजिप शाळा तळे मराठी येथे २०२५/२६ या वर्षाच्या गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अरुण खुळपे, प्रा.नागेश नायडू, भगवान लोखंडे, उल्का माडेकर, डॉ. सतिश वडके, आशा सकपाळ, संजय गुंजाळ, गणेश कोळी, सुखद राणे, ॲड. परेश जाधव, संदिप जामकर यांनी मनोगत व्यक्त केले. गुणवंत शिक्षक म्हणून प्रिया गायकवाड, अरुण खुळपे, नागेश नायडू, प्रा. भगवान लोखंडे, उल्का माडेकर, ॲड.परेश जाधव यांचा सन्मान करण्यात आला तर विशेष उल्लेखनीय कार्य सन्मान पुरस्कारात गीता जाधव, कृष्णा महाडिक, डॉ. सतिश वडके, सतिश गवई, आशा सकपाळ, रमेश शिंदे, शिरीष सुतार, सुधाकर क्षिरसागर, राकेश पवार, श्रध्दा गंगुत्रे यांना सन्मानित करण्यात आले. काव्यलेखन विजेते प्रथम रंजना करकरे, द्वितीय क्र. सायराबानू चौगुले, तृतीय क्र. प्रतिक्षा नगरकर, दिगंबर आडित, उत्तेजनार्थ दिपक सकपाळ, केतकी सुतार, शामसुंदर गावकर यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी तर आभारप्रदर्शन कृष्णा कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरत जोशी, विजय चव्हाण, रत्नाकर गुरव, सुप्रिया जामकर, श्रेयस रोडे, धोंडिबा आंबेगावे यांनी परिश्रम घेतले.



## विद्यार्थ्यांची मोफत रक्त तपासणी

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी परिसरातील रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे येथे प्रायमा व आरके लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवार (दि.१६) सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी ३४ विद्यार्थाची मोफत रक्तगट तपासण्यात आले. याप्रसंगी रोहिणी खाने, दिपीका पाटील, शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक पाटील, शहाजी अभिमन्यू घाय तिडक, जागृती जीवन तेलंगे व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन

| खांब | प्रतिनिधी |

दीपक नायट्राईट कं. धाटाव आणि दीपक फाऊंडेशन रोहा व मैत्री प्रतिष्ठान सामाजिक संस्था रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने सानेगाव येथील आश्रम शाळेत किशोरवयीन विद्यार्थीनींसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन व सॅनिटरी पॅडचे मोफत वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मैत्री प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष निलेश वारंगे, महेश खांडेकर, नारायण चितळकर, राजेश काफरे, भारत वाकचौरे तसेच दीपक फाऊंडेशनच्या प्रकल्प समन्वयक प्रिती कापसे, प्राजक्ता धुमाळ, प्राची शिर्के, अमोल जाधव व सानेगाव आश्रम शाळेचे एम. पी. पाटील, मिलिंद पाटील, दिलिप सकपाल, निलेश म्हात्रे, अधिक्षका प्रेरणा मेंगळ, मनिषा ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.



## वेदक इंजिनिअरींग कॉलेजमध्ये अभियांत्रिकी दिन साजरा

| तळा | प्रतिनिधी |

जी. एम. वेदक इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलोजी तळा व राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या माध्यमांतून शिक्षक दिन व अभियांत्रिकी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा उमेरा खानदेशी, प्रिया मोरे, विपुल खेताम, प्राची पाटील, निलिमा मोरे, त्रिशा पटेल, समिरा हिरवे, शुभम् घाडेकर, साक्षी अहिराव, श्रुती खामकर, करुणा घोरसे, श्रुती काळे, शिवानी खातू, स्नेहा दळवी, गणेश वासकर, आयुष सिंह, तन्मय सुतार, ओम ढोकळे, पार्थ अरुणकर, शरवी गुरव, आदित्य करंडे, यश भावसार, अथर्व म्हात्रे, रुची राव इत्यादी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केला.याप्रसंगी प्र. प्राचार्य संजय गवळी, पुरुषोत्तम मुळे, ओमप्रकाश पाटील, अक्षय घाडगे, कौस्तुभ रिसबूड, यश शेट यांचे सह प्रा हेमंत ठाकूर, प्रा संजय जाधव, प्रा पंकज धोंगडे, प्रा सर्जे, प्रा. गोविंद रायफूले, प्रा. सार्थक धोंगळे, प्रा. उमेरा खानदेशी, प्रा. मयूरी निवेकर, प्रा. नमिता रिसबूड-जाधव व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

## 'नवदुर्गे'च्या आगमनाची उत्सुकता

**उरण :** गणेशोत्सवाची धूमओसरत नाही तेव्हाच नवरात्रोत्सवाच्या आगमनाची चाहूल लागली आहे. नवी मुंबईतील विविध मूर्तीशाळांमध्ये दुर्गेच्या मूर्तींना अंतिम स्पर्श देण्याची लगबग सुरू झाली आहे. पितृपक्ष संपताच घटस्थापनेची तयारी सुरू होणार असल्याने मूर्तिकार दिवस-रात्र मेहनत घेऊन मूर्ती सजवण्यात गुंतले आहेत. देवीच्यामूर्तींना आकर्षक रंगसंगती यामुळे नवचैतन्य प्राप्त झाले आहे. घरगुती मूर्तींची कामे जवळपास पूर्णत्वाला आली असून, मोठ्या मूर्तींवर अंतिम रंगरंगोटी सुरू आहे. मजुरीच्या दरवाढीमुळे यंदा मूर्तींच्या किमतींमध्ये तब्बल २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे मूर्तिकारांनी स्पष्ट केले आहे.

## रोह्यात शिवसैनिकांचे आंदोलन

| रोहा | प्रतिनिधी |

पुलवामा येथे भारतीय नागरिकांवर झालेला दहशतवादी हल्ला हा देशाच्या अभिमानाला व सन्मानाला तडा देणारा प्रकार ठरला. अशा वेळी पाकिस्तान विरुद्ध कठोर भूमिका घेण्याऐवजी केंद्र सरकारकडून भारतीय क्रिकेट संघाला त्यांच्या विरोधात सामन्याची परवानगी देण्यात आली. या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवत शिवसेनेच्या वतीने रोह्यात आंदोलन करण्यात आले.

रोहा तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या जाज्वल्य भावनेने या आंदोलनात सहभाग घेतला. रविवारी (दि.१४) रोजी धाटाव येथील शिवसेना कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले. हातात भगवे झेंडे, अंगात उर्मी, चेहऱ्यावर देशभक्तीची जाज्वल्य भावना आणि घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला.

आंदोलना प्रसंगी तालुकाप्रमुख नितीन वारंगे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, देशातील जवानांवर, नागरिकांवर हल्ले होत असताना पाकिस्तानला मैदानात खेळण्याची संधी देणं हे देशाच्या शहिदांचा अपमान आहे. असा निर्णय देशप्रेमी नागरिकांना कधीही मान्य होणार नाही. देशाच्या सन्मानासाठी आवश्यक तेव्हा शिवसेना रस्त्यावर उतरेल असे तालुका वारंगे यांनी सांगितले . या आंदोलनात रोहा तालुक्यातील सर्व पदाधिकारी, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, विभाग प्रमुख, उपतालुकाप्रमुख, शिवसेना युवा सैनिक, महिला आघाडी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलना दरम्यान परिसरात देशभक्तीच वातावरण निर्माण झालं होत.

## कोलाड शाळेत संगणकाचे धडे

**कोलाड :** जिल्हा परिषदेची शाळा म्हटली की शिक्षणाचा कमी दर्जा, असुविधा, नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अभाव असे चित्र अजूनही अनेकांच्या डोळ्यासमोर उभे राहते. पण मागील काही वर्षांत जिल्ह्यातील अनेक शाळांचा कायापालट झाला आहे. रोहा तालुक्यातील कोलाड गावातील शाळा त्यापैकीच एक शाळा आहे. ही शाळा जणू संगणकीय प्रयोगशाळाच बनली असून विद्यार्थी थेट संगणकाचे धडे गिरवत आहेत. यावेळी चैताली समीर मोरे, अमोल बाईत, प्रवीण घाग, येरुणकर, नंदकुमार तेलंगे, मानसी जोशी, रुची सामंत, सपना थळे, दर्शन मांडूस्कर, संतोष साठे, शालिनी हिलम, प्राची घोणे, निलेश विचारे, रुंजी पाष्टे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

औद्योगिकीकरणाचा आदिवासाला फटका | बदलत्या वातावरणाची झळ

# पर्यावरण असंतुलनामुळे कावळ्याच्या संख्येत घट

| उरण | प्रतिनिधी |

**हिंदू धर्मात पितृ पक्षाला महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हा पितृ पक्षात पूर्वजांचे स्मरण करून त्यांना नैवैद्य अर्पण केले जाते. घरावर किंवा टेरेस वर अन्न किंवा नैवेद्य ठेवले जाते. यासाठी कावळा या पक्षाला अन्न ग्रहण करण्यासाठी बोलाविले जाते. याला अनेक ठिकाणी काव, काव असेही म्हणतात.अनंत चतुर्दशीनंतर पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भाद्रपद महिन्यातात कृष्ण पक्ष सुरू होतो. भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून भाद्रपद अमावस्येपर्यंतच्या काळाला हिंदू धर्मातील महत्त्वाचा पितृपक्ष किंवा पितृ पंधरवडा म्हणतात.**

पितृपक्ष आणि कावळे यांचे समीकरण, नाते रूढ आहे, ऐरवी कावळ्याला कधीही जवळ न करणारेदेखील पितृपक्षात काव... काव..करत असतात. यंदा मात्र पितृपक्ष अर्ध्या अधिक संपला, तरी कावकाव फारशी कानावर येत नसल्याचे दिसते. आपल्या पूर्वजांसाठी ठेवलेला नैवेद्य किंवा पिंडाला स्पर्श करण्यासाठी देखील कावळा दिसत नसल्याने यंदा कावळे गेले कुठे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पूर्वजांचे प्रतिनिधित्व करणारा हा पक्षी ऐरवी अशुभ मानला जात असला, तरी पितृपक्षात कावळ्याला अन्न देणे हे शुभ मानले जाते, जे पितरांना तृप्त करते आणि त्यांना मोक्ष मिळवून देते, अशी धारणा आहे. मात्र, गेल्या काही दिवसांत अन्य वन्यजीवांप्रमाणेच कावळ्यांची संख्याही झपाट्याने कमी होताना दिसत आहे.



ग्रामीण भागात कावळे दिसत असले, तरी शहरी भागातील त्यांची संख्या कमी होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. पर्यावरणात झपाट्याने होत असलेल्या बदलामुळे अनेक वन्यजीव पशुपक्षी नष्ट झाले असून येत्या काळात अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. याबद्दल प्राणीप्रेमी व पर्यावरण प्रेमीनी चिंता व्यक्त केली आहे.

पशु पक्षी नामशेष होण्याच्या संदर्भात संदर्भात प्राणी मित्र राजु मुंबईकर यांच्याशी संपर्क साधले असता त्यांनी सांगितले की, शहरी भागात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत.औद्योगीकिकरण सूरु आहे. त्यामुळे झाडांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. वनतोड मोठया प्रमाणात होत आहे. पर्यायी वनांची निर्मिती होत नसल्याने कावळ्यांसह अन्य पशुपक्ष्यांची निवारास्थाने नष्ट होत आहेत. त्याचबरोबर मोबाईल टॉवरच्या रेडिएशनचा परिणाम पक्ष्यांवर होत असून, रेडिएशनच्या तीव्रतेचा फटका चिमण्यांइतकाच कावळ्यांनाही बसत आहे. त्यामुळे अन्य पशु पक्ष्यांप्रमाणेच कावळ्यांची संख्या देखील झपाट्याने कमी होऊ लागली आहे. यावर वेळीच उपाय न केल्यास भविष्यात कावळ्यांची केवळ छायाचित्रेच दिसतील, आपल्याला कावळा फक्त मोबाईल, टीव्ही पुस्तक व वृत्तपत्रात दिसतील मात्र प्रत्यक्ष कावळा शोधूनही सापडणार नाही.

> उंदीर व लहान प्राण्यांना विष टाकून मारण्यात येते. कावळे हे उंदीर खातात. पण विष त्यांच्या शरीरात तसेच राहते. त्यामुळे कावळ्यांचा विषारी रसायनामुळे मृत्यू होतो. या बाबीवर वेळीच लक्ष देऊन घातक रसायनवर बंदी घातली पाहिजे. जेणेकरून विविध पशु पक्ष्यांच्या जीवितेला धोका पोहोचणार नाही.
> - राजू मुंबईकर, संस्थापक अध्यक्ष केअर ऑफ नेचर संस्था, पक्षीमित्र

# ‘नवरात्र उत्सव शांततेत पार पाडा’

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

नवरात्र उत्सवाला प्रारंभ २२ सप्टेंबर रोजी होत आहे. त्या अनुषंगाने खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत सर्व नवरात्र उत्सव मंडळ, गाव पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती. गावातील नवरात्रौत्सवाची पूर्व परवानगी पोलीस ठाणेकडून घेण्यात यावी. संबंधित स्थानिक प्रशासन नगरपालिका, ग्रामपंचायत यांचा नाहरकत दाखला महत्वाचा आहे.स्पिकर परवानगी अर्ज सादर करावा,नवरात्रौत्सवासाठी तयार केलेले मंडप व्यवस्थीत व मजबुत असावे जेणेकरुन ते पावसामध्ये टिकेल तसेच मंडप ज्या ठिकाणी बांधायचे आहे ती जागा सार्वजनिक किंवा खासगी असल्यास त्याप्रमाणे परवानगी घ्यावी. गरबा दांडीया खेळताना रस्त्यावर अडथळा होवु नये. गरबा दांडीयाची आक्षेपार्ह, बिभत्स गाणी वाजवू नयेत. गरबा, दांडीया खेळताना महिला छेडछाड, विनयभंग यासारखे प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. व्यसन करुन गरबा दांडिया खेळणार नाही



याची आयोजकांनी दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३०/१, एकूण क्षेत्र ०.४१.००(हे.आर), आकार १४.४२ (रु.पैसे), या मिळकतीचे विद्यमान मालक रमणीकलाल करमसी पटेल, रा.अलिबाग यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांसोबत व्यवहाराबाबत बोलणी केलेली आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १२ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक - १७/०९/२०२५.

**(ॲड.परेश एम.घरत)**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी. स्टँड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड
९८५०४८१२३४

**महाराष्ट्र राज्य**
**अलिबाग वनविभाग**
## जाहीर सुचना

याद्वारे सुचना देण्यात येते की, श्री.कैलास कृष्णा कापडे, उ.व. ४८, धंदा- व्यापार, रा. साने गुरुजी कॉलनी, हिवरखेडा रोड, ता. जामनेर, जि. जळगांव आरागिरणी विक्रीदार यांनी खाली सही करणार यांना कळविले आहे की, श्री अमरसी वालजी पटेल रा. पेण यांचे नांवे असलेली, विजय लक्ष्मी सॉ मिल, पेण परवाना क्र. जुना ०२/२०१३ व नविन ०७/२०१४, ID NO. MH2221THAL उ.व. ७१. धंदा व्यापार, रा.पेण, ता.पेण, जि. रायगड त्यामधील आरागिरणी यंत्र, साईज ४२ इंच उभा (एक) व ४२ इंच आडवा (एक) श्री अमरसी वालजी पटेल रा. पेण यांचे कडुन श्री. कैलास कृष्णा कापडे यांना विक्री केली आहे. त्याअनुषंगाने सदर सॉमिल परवाना हस्तांतरण, स्थानांतरण नामांतरण करण्याकामी प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झाला आहे.

तरी उक्त मालमत्तेवर वारसा, गहाणखत, विक्री, लिज, कायदेशीर हक्क, भेट किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हित संबंध हस्तांस्तरण, पुर्नस्थान निश्चय व नामांतरण तसेच विक्री संबंधात कोणत्याही आक्षेप असणाऱ्या व्यक्तीने व दावा करणाऱ्या व्यक्तीनी या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांत सदसंबंधी माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह निम्न स्वाक्षरीकर्ते यांना खालील कार्यालयाच्या पत्यावर लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा उक्त संबंधात कोणताही दावा वा आक्षेप नसल्याचे समजण्यांत येईल आणि त्यांनंतर कोणत्याही दावा व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

सही/-
**(राहुल पाटील, भा.व.से.)**
**उप वनसंरक्षक**
**अलिबाग, वनविभाग अलिबाग**

**कार्यालयाचा पत्ता**
उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग यांचे कार्यालय हिराकोट तळ्यापुढे जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे कार्यालय मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड अलिबाग पिन कोड क्र. ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली स्थावर मिळकत श्री.अनिल जयदेव चव्हाण व सौ.अंजली अनिल चव्हाण यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीची मिळकत असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी त्यांच्याकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग जि.रायगड येथील स.नं. ६०/१, प्लॉट नं. ६, क्षेत्र ३०२ चौ.मी. आकार ३०.२० रू.पै. या मिळकतीवरील बांधण्यात आलेली नियोजित शिव महिमा बिल्डींग मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.१०३, रेरा कायद्याप्रमाणे क्षेत्र २४.३४ चौ.मी. कारपेट क्षेत्र बाल्कनी ४.७१ चौ.मी. व वेदर रोड ७ चौ.मी ही मिळकत

वर नमुद मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, फरोक्तखत, ताबा, मृत्यूपत्र, बयाणा पावती, जप्ती, लिज, लियन, पोटगी, बक्षीस, भाडेपट्टा, गहाण, दान, वारसाहक्क, व अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत कळवावे. मुदतीमध्ये हरकत न आल्यास माझे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदीव्यवहार पुर्ण करतील व सदरच्या मुदतीनंतर कोणतीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. रसिका द. राऊत**
बी.एल.एस.एल.एल.बी
अलिबाग-रायगड
९६३७१६१४४६

## ''जाहीर नोटीस''

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तशा आशयाची बोलणी त्यांचा व आमचा खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमचा अशिलांना विद्यमान मालक श्री.शेखर शाम शेट्टे वगैरे यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सारळ ता.अलिबाग | १४२ | ०.५३.६०+पो.ख ०.०४.८० | १३.२५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही वहिवाट दान, गहाण, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकारार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोत्री, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न असल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागवून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदारांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१७/०९/२०२५

खरेदीदारांचे ॲडव्होकेट
**डॉ.ॲड. निहा अनिस राउत**
''लबैक' इस्त्राइल आळी,
पो.ता.अलिबाग, जि.रायगड
पिन नं. ४०२ २०१
मोबा.नं. ८३७८९६४३३३

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २१५/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. राकेश शांताराम पाटोळे
वय ३५ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. नाणोरे,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. राकेश शांताराम पाटोळे यांचे आजोबा कै. तुकाराम भाग्या पाटोळे हे दि. १५/०३/१९८७ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं/जन्म-मृत्यू/८४८/२०२५-२६ ने दि. ०८/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे आजोबा कै. तुकाराम भाग्या पाटोळे हे दि. १५/०३/१९८७ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. राकेश शांताराम पाटोळे यांचे आजोबा कै. तुकाराम भाग्या पाटोळे हे दि. १५/०३/१९८७ रोजी मौजे नाणोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव :
ता. : १५/०९/२०२५

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१८/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. अजीजा शेख हसन धनसे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. अजीजा सादुल्ला कर्जीकर
लग्नानंतरचे नाव — अर्जदार
वय ४३ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. मु. पो. दहिवली,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. अजीजा शेख हसन धनसे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. अजीजा सादुल्ला कर्जीकर - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/०३/१९८२ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०४/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/०३/१९८२ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. अजीना शेख हसन धनसे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. अजीजा सादुल्ला कर्जीकर-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/०३/१९८२ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता. २६/०८/२०२५

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

दिनांक : १७/०९/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २०६, क्षेत्र ०-१२-२० हे. आर., पो. ख ०-००-३० हे. आर. एकुण क्षेत्र ०-१२-५० हे. आर., आकार १.०७ रू. पै. या मिळकतीपैकी उत्तरेकडील क्षेत्र ०-०४-५० हे.आर. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रोहिदास विठ्ठल थळे रा. मु. पो. आ-वास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
तारीख : १७/०९/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे नाडसुर, ता.सुधागड,जि.रायगड येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. गोविंद दगडु शिर्के. | ८५४ | १-२०-०० | ०-१७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १७/०९/२०२५

खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास,पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्री.अशिष अंकुश वार्डे, रा.मु.म्हात्रोळी, पो.सारळ, ता. अलिबाग, जि.रायगड यांनी सांगितल्यावरून, दिलेल्या कागदपत्रांवरून नोटीस प्रसिद्ध करण्यात येते की,

आमचे अशिलांचे सामाईक मालकीच्या मौजे- म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २३१/१, व गट नं.२३१/२ अशा वर्णनाच्या मिळकती आहेत. सदर आमच्या अशिलांच्या मिळकतीच्या लगत मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. २३३ क्षेत्र ०-३६-१० हे.आर. आकार ४.०० रू. पैसे अशा वर्णनाची ७/१२ सदरी निखील मनहरलाल शहा यांच्या नावे दाखल असलेली मिळकत आहे. सदरची गट नं.२३३ ही मिळकत आमच्या अशिलांच्या ताबे वहिवाट व कसवणुकीत मागील अनेक वर्षापासून आहे. आमचे अशिल सदर मिळकतीत हंगामी पिके घेत आहेत. आमच्या अशिलांची गट नं. २३३ या मिळकतीवर ताबे वहिवाट व कसवणुक मागील अनेक वर्षापासुन असुन त्यास अद्यापपर्यंत कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत उपस्थित केलेली नाही. मौजे म्हात्रोळी, गट नं. २३१/१ व २३१/२ या मिळकती सुद्धा निखील शहा यांच्या मालकीच्या होत्या. सदरच्या मिळकती आमचे अशिल अशिष अंकुश वार्ड वगैरे यांनी निखील शहा यांच्या कडुन नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेल्या आहेत. सदरच्या गट नं. २३१/१ व २३१/२ या मिळकती खरेदी करताना गट नं. २३३ ही मिळकत सद्धा आमच्या अशिलांना विकत देण्याची निखील शहा यांनी कबुल केलेली आहे. व त्याची माहिती त्यांचे वारसांना आहे. व तसा कागदोपत्री पुरावा आमच्या अशिलांकडे आहे. असे असताना, मौजे म्हात्रोळी, गट नं. २३३ ही मिळकत आमच्या अशिलांचा हक्क डावलुन मिळकतीच्या ७/१२ सदरी केवळ आपले नाव दाखल असल्याचा गैरफायदा घेवुन सदरची मिळकत त्रयस्थ इसमांस विकत असल्याचे आमच्या अशिलांस खात्री लायक कळलेले आहे. मौजे म्हात्रोळी, गट नं.२३३ ही मिळकत आमच्या अशिलांना खरेदी करण्याची आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी, गट नं.२३३ या मिळकतीचा खरेदी विक्री व्यवहार निखील मनहरलाल शहा व त्यांच्या वारसांशी कोणीही करू नये त्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत आहे. याउपर सदर मिळकतीचा खरेदी विक्री व्यवहार केल्यास त्याविरूद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. त्यावेळेस होणाऱ्या कायदेशीर परिणामांस संबंधीत मिळकत खरेदी करणारे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/०९/२०२५

**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यांत येते की, माझे अशिल इफ्तिकार मोहम्मद सोलकर, रा. जुनी पेठ, मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड यांचे मालकीची व खुद्द ताबे, कबजा, वहिवाटीची मौजे मुरुड, तालुका मुरुड जिल्हा रायगड येथील सिटी सर्वे नंबर ११५२ ही मिळकत व त्यामधे असलेले जुने घर नगरपरिषद मुरुड घर नं.१०/५३ हे आहे.

सदर मिळकत ही श्री इमरान नूरुद्दीन मलिक, रा.जुनी पेठ, मुरुड, ता. मुरुड, जि.रायगड यांनी स्वतःला एक विकसक आहोत असे भासवत माझ्या अशिलांच्या मालकीची वर वर्णन केलेली मिळकत विकसित करण्याकरता घेतली होती.

सदर मलिक यांनी मिळकतीमध्ये बांधण्यात येणाऱ्या इमारतीकरीता परवानगी मिळवणे, इमारतीमधील सदनिका विक्री करणे वगैरे करता दिनांक १५ मे २०१५ रोजी माझ्या अशिलांकडून एक नोंदणीकृत कुलअखत्यारपत्र करून घेतले आहे. सदर कुलअखत्यारपत्र दुय्यम निबंधक मुरुड यांचे कार्यालयात नोंदण्यात आलेले असून त्याचा नोंदणी क्रमांक ३०४/२०१५ असा आहे.

प्रस्तुत मिळकतीबाबत मलिक यांनी मुदतीमधे विकास काम केले नाही, यानंतर त्यांना वकीलांमार्फत देण्यात आलेले नोटीसांनंतर त्यांनी घेतलेले मुदतवाढीनंतरही मिळकतीचे विकास काम पुर्ण केले नाही या कारणाने माझे अशिलांनी दिनांक ११/९/२०२५ रोजी इमरान मलिक यांना वकीलामार्फत नोटीस पाठवुन सदर ३०४/२०१५ चे कुलअखत्यारपत्र रद्द केले आहे. तसेच या प्रकारे सदर अखत्यारपत्र रद्द केले बाबत दुय्यम निबंधक मुरुड, तहसीलदार मुरुड, मुरुड पोलीस स्टेशन व नगरपरिषद मुरुड यांना कळविले आहे.

याबाबतची परिस्थिती सर्वांना अवगत व्हावी व त्या प्रकारे श्री. मलिक यांना माझे अशिलांनी दिलेल्या अखत्यारपत्राच्या आधारे कोणी कसलाही व्यवहार मलिक यांचेसोबत करू नये व स्वतःची फसवणुक करून घेऊ नये याकरता ही जाहीर नोटीस माझे अशिलांतर्फे आज रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये बांधण्यात आलेले इमारती बाबत श्री. मलिक यांचेसोबत कोणीही कसलाही व्यवहार करार करू नये. याप्रकारे व्यवहार करण्याकरता माझे अशिलांनी श्री. मलिक यांना दिलेले अखत्यारपत्र रद्द केलेले असून या जाहीर नोटीसने पुन्हा ते रद्द केलेबाबत जाहीर प्रकटन माझे अशिल करत आहेत. यामुळे श्री. मलिक यांना वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये करण्यात आलेल्या अर्धवट बांधकामामधून कोणताही निवासी गाळा विक्री करण्याचा अधिकार आता राहिलेला नाही. याबाबत माझे अशिल त्यांचेविरुद्ध योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करत आहेत. या उपरही कोणी या मिळकतीमध्ये असलेले इमारतीमधील निवासी गाळ्याबाबत श्री. मलिक यांचे सोबत काही करार व्यवहार केल्यास त्या व्यक्तीसही या दिवाणी वा फौजदारी कारवाईमध्ये सामील करून घेणे नाईलाजाने माझे अशिलांना भाग पडेल. या प्रकारे कोणी काही करार, व्यवहार मलिक यांच्यासोबत केल्यास व त्यामुळे असा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचे काही नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी असा व्यवहार करणारी व्यक्ती जबाबदार राहील.

तरी, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १६/९/२०२५

Cjayant Law Office
करीता
**ॲड. जयंत ह.चेऊलकर.**
२०१, सृष्टी, २ रा मजला,
वेधशाळेसमोर अलिबाग, रायगड.

फोन नं.- २४५५३५

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन-४०२ २०४

जावक क्र.-१२९१ — दिनांक : १७/०९/२०२५

## जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधांच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्राम पंचायत नागांव कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | गावाचे नाव | घर क्र. | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नागांव | २८३९ | पराग शशिकांत देशमुख | संजय धर्मा मोरे |
| २ | | १४७३ | सागर श्रीकांत नाईक | मीनाक्षी श्रीकांत नाईक |
| ३ | | १५३ क<br>१५३ अ-२<br>१५३ अ-१ | वीणा प्रभाकर चोरघे | विघ्नहरी पेरू पाटील<br>मदन येरू पाटील |
| ४ | | १७२८ | राजेंद्र चंद्रकांत ढापरे | संतोष लक्ष्मण पाटील |
| ५ | | २३५० | विजय गणपत साळवी | सुशील वामन जाधव |
| ६ | | ३१८८ | मदन मेघश्याम थिंगळे<br>मयुरेश मदन थिंगळे | स्मिता भारतभूषण दिघे |

सही/-
**सौ.हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. मनोहर प्रभाकर पिंपरकर, रा.आंबिवली, पेठ, ता.कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांच्यातर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की,

श्री.भास्कर भक्तदास रॉय, रा.फ्लॅट नं.१२०४, ‘ए’ विंग, गौरव गार्डन कॉम्पलेक्स, बंदर पाखाडी रोड, मुंबई, ४०००६७, यांच्या ताबेकब्जाच्या व मालकी वहिवाटीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे आंबिवली तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ६३/५/अ | ०.४९.०० | ०.४५ |
| ६३/१० | ०.९२.०० | ०.७५ |
| ६३/११ | ०.५९.०० | ०.२८ |
| ६३/१२ | ०.५९.०० | ०.४१ |
| ६३/१५ | ०.०९.०० | ०.०८ |

वर वर्णन केलेल्या जमिनी मिळकतीच्या संदर्भात सर्व कायदेशीर कामे करण्यासाठी श्री. भास्कर भक्तदास रॉय यांनी आमच्या अशिलांस नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे. सदय स्थितीत सदर मिळकत ही आमच्या अशिलांच्या ताबेकब्जात व वहीवाटीत आहे.

श्री.भास्कर भक्तदास रॉय यांनी सदर जमिन मिळकती कुणासही विक्री केलेल्या नाहीत. परंतु, काही त्रयस्थ इसमांनी श्री.भास्कर भक्तदास रॉय यांच्या नकळत सदर जमिन मिळकतीचे बेकायदेशीर खरेदीखत नोंदविलेले आहे. याबाबत सदर त्रयस्थ इसमांवर श्री. भास्कर भक्तदास रॉय यांच्यातर्फे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीने गहाण, दान, साठेकरार, करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, विकसन करार, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये.

सदर मिळकती बाबत सदर व्यक्तीबरोबर कोणीही व्यक्तीने कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदर व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच सदर व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १४/०९/२०२५

सही/-
**ॲड. उषा जे.कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल''निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

आमचे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील १) गट क्रमांक व उपविभाग ३०/२, एकूण क्षेत्र २२.९०.०० (आर.चौ.मीटर), आकार २२९.०० (रु.पैसे), २) गट क्रमांक व उपविभाग २४/१/ब/१, एकूण क्षेत्र ४.८४.०० (आर.चौ. मीटर), आकार ४८.४० (रु.पैसे), ३) गट क्रमांक व उपविभाग २४/१/ब/३, एकूण क्षेत्र ८१६.०० (आर.चौ.मीटर), आकार १६.३२ (रु.पैसे) या बिनशेती मिळकतींचे विद्यमान मालक फिरदोस राजबाली मर्चंट, मेहराज राजबाली मर्चंट, रा.मुंबई यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांसोबत व्यवहाराबाबत बोलणी केलेली आहेत. सदरहू मिळकती या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १२ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १७/०९/२०२५

**(ॲड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक १) श्री. स्वप्निल दिपक मोगारे २) श्री. विजय मारूती बिबवे कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - जामरूंग, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे जामरूंग | १३ | २/ब | ०.२१.००<br>पो.ख. ०.०९.०० | ०.५२ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १८/०९/२०२५

खरेदीदार तर्फे वकील
**ॲड.लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## ''जाहीर नोटीस''

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तशा आशयाची बोलणी त्यांचा व आमचा खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना विद्यमान मालक श्री.अमोल रमेश म्हात्रे यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सारळ ता.अलिबाग | १३८/२ | २.९०.०० | ५८ रु. |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही वहिवाट, दान, गहाण, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदारांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१७/०९/२०२५

खरेदीदारांचे ॲडव्होकेट
**डॉ.ॲड. निहा अनिस राउत**
''लबैक'' इस्त्राइल आळी,
पो.ता.अलिबाग, जि.रायगड
पिन नं. ४०२ २०१
मोबा.नं. ८३७८९६४३३३

## निवडक

### जेमिमा रॉड्रीग्जची तापामुळे माघार

**चंदीगड :** भारत आणि ऑस्ट्रेलिया संघातील एकदिवसीय मालिकेचा दुसरा सामना बुधवारी (दि.१७) खेळवला गेला. ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, या सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला. भारताची मधल्या फळीतील फलंदाज जेमिमा रॉड्रीग्ज हिला ताप आल्यामुळे तिला उर्वरित दोन सामन्यांमधून माघार घ्यावी लागली आहे. एकदिवसीय विश्व चषक स्पर्धेपूर्वी भारतीय संघाची चिंता वाढवणारी गोष्ट आहे. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारतीय महिलांनी ठेवलेले २८२ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने ४४.१ षटकांत २ गडींच्या मोबदल्यात सहज पार केले होते. या सामन्यात जेमिमा रॉड्रीग्जने १८ धावांची खेळी केली होती. बीसीसीआयची वैद्यकीय टीम तिच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. जेमिमाच्या जागी संघात पुण्याच्या तेजल हसबनीस हिची मुख्य संघात निवड केली गेली आहे.



### जानकीबाई जनार्दन ठाकूर शाळेचे यश

**चिरनेर :** उरण येथील सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कुल येथे पावसाळी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे अयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आवरे येथील आत्माराम ठाकूर मिशन व जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्रजी माध्यमने प्रथम क्रमांक मिळवून यश प्राप्त केले आहे. त्यामुळे विजेत्या स्पर्धकांचे व क्रिडा शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. हा विजय शाळेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अशोक ठाकूर यांना अर्पण करण्यात आला आहे. संस्थेचे विश्वस्त वामन ठाकूर, अलका ठाकूर, सिंधु ठाकूर, मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी विजेत्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

### स्मृती मानधनाचे दमदार शतक

**चंदीगड :** स्मृती मानधनाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक ठोकून भारताला दमदार सुरुवात दिली. तिच्या शतकामुळे ती महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करणाऱ्या खेळाडूंमध्ये टॉप-३ मध्ये आली आहे. तिच्या या कामगिरीमुळे भारताच्या आगामी एकदिसीय विश्व चषकाच्या तयारीला बळकटी मिळाली आहे. भारतीय महिला संघ बुधवारी (दि.१७) ऑस्ट्रेलिया महिला संघाविरुद्ध दुसरा एकदिवसीय सामना सुरू होता. मुल्लनपूरला होत असलेला हा सामना भारताच्या स्मृती मानधनाने गाजवला आहे. नुकतीच जागतिक एकदिवसीय क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आलेल्या स्मृती मानधनाने या सामन्यात शतकी खेळी करत तिचा दर्जा दाखवून दिला आहे. आगामी विश्वचषकाच्या दृष्टीने स्मृतीचे हे शतक भारतासाठी सुखावणारे आहे.



### भारताचा वरूण चक्रवर्ती अव्वल

**नवी दिल्ली :** भारताचा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती टी-२० क्रमवारीत क्रमांक एकचा गोलंदाज ठरला आहे. तो या यादीत अव्वल स्थान मिळवणारा तिसरा भारतीय गोलंदाज ठरला आहे. याआधी बुमराह व बिश्नोई हे अव्वल होते. ३४ वर्षीय गोलंदाजाने सातत्यपूर्ण कामगिरी करताना न्यूझीलंडच्या जेकब डफीकडून अव्वल स्थान हिसकावले आहे. त्याने यासह वेस्ट इंडिजच्या अकील होसेन व ऑस्ट्रेलियाच्या अ‍ॅडम झम्पालाही मागे टाकले आहे. या वर्षाच्या सुरूवातील वरूणने इंग्लंडविरुद्ध ५ बळी घेतले होते आणि आशिया चषक स्पर्धेतही तो चांगली गोलंदाजी करत आहे. त्याला दोन सामन्यांत २ बळी घेता आले असले तरी त्याची इकॉनॉमी चांगली आहे. यूएईविरुद्ध त्याने ४ धावा देताना १ बळी, तर पाकिस्तानविरुद्ध २४ धावांत १ बळी घेतला होत. ताज्या त्यामुळे क्रमवारीत वरुण तीन स्थान वर सरकला असून इंग्लंडचा आदिल राशीद तीन स्थान घसरून पाचव्या क्रमांकावर गेला आहे.



# भारतीय संघाला मिळाला नवा प्रायोजक

## अपोलो टायर्स सोबत करार

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

देशात ऑनलाइन गेमिंग प्रमोशन आणि रेग्युलेशन बिल २०२५ लागू करण्यात आल्यामुळे बीसीसीआयने ड्रीम ११ बरोबरचा करारही संपुष्टात आणला होता. त्यामुळे भारतीय संघ आशिया चषक स्पर्धेत प्रायोजकाशीवाय खेळताना दिसत आहे. त्याचवेळी बीसीसीआयने नव्या प्रायोजकाचा शोध सुरू केला होता आणि त्यांच्या हाती मोठे डिल लागले आहे. आता अपोलो टायर्स हा भारताचा नवा जर्सी प्रायोजक असणार आहे. बीसीसीआयने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलद्वारे अपोलो टायर्ससोबतच्या कराराची पुष्टी




केली असून हा करार अडीच वर्षांसाठी असणार आहे. त्यांनी एका सामन्यासाठी ४.५ कोटी रुपये मोजण्याची तयारी केली आहे. यापूर्वी ड्रीम ११ एका सामन्यासाठी ४ कोटी रुपये मोजत होते.

भारतीय संघाच्या जर्सीवर पूर्वी ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्म ड्रीम११ चे नाव होते. परंतु; भारत सरकारने ऑनलाइन मनी गेमिंगबाबत एक नवीन कायदा बनवला आहे, ज्यामुळे ऑनलाइन मनी गेम चालवणे आणि त्यांचा प्रचार करणे दंडनीय ठरणार आहे. त्यासोबतच, असे करणाऱ्यांना तुरुंगवासाची शिक्षा देखील भोगावी लागू शकते. या कारणास्तव, बीसीसीआयने ड्रीम ११ सोबतचा करार पूर्ण करण्यापूर्वीच हा करार अर्ध्यावरच संपवला आहे. सध्या भारतीय संघ आशिया चषकात प्रायोजकाशिवाय खेळत आहे. आता बीसीसीआयने जर्सीसाठी नवीन प्रायोजक शोधला आहे. त्यामुळे अपोलो टायर्स हा भारताचा नवा जर्सी प्रायोजक असणार आहे. तत्पूर्वी भारतीय संघाच्या जर्सी प्रायोजकाच्या शर्यतीत कॅन्वा व जेके टायर्स या दोन कंपन्याही होत्या. त्याशिवाय बिर्ला ऑप्टसनेही इच्छा व्यक्त केली होती. बीसीसीआयने २ सप्टेंबरला त्यासाठी अर्ज मागवले होते. परंतु, त्यांनी बिडिंग प्रक्रियेत सहभाग घेतला नाही. बीसीसीआयने भारतीय संघाच्या प्रायोजकत्वासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख १६ सप्टेंबरपर्यंत ठेवली होती आणि बोर्डाने मंगळवारी अपोलो टायर्सचे नाव अंतिम केले आहे. तसेच, या प्रक्रियेत बीसीसीआयने गेमिंग, बेटिंग, क्रिप्टो व तंबाखूच्या ब्रँड्सनी सहभाग घेऊ नये, हे स्पष्ट केले होते.

### बीसीसीआयचा अडीच वर्षांचा करार

**बीसीसीआय आणि अपोलो टायर्समधील यांच्यातील हा करार अडीच वर्षांसाठी आहे. मार्च २०२८ पर्यंत भारतीय संघाच्या जर्सीवर अपोलो टायर्सचे नाव राहणार आहे. या कालावधीत भारतीय संघाचे जवळपास १३० सामने होणार आहेत. त्यांनी एका सामन्यासाठी ४.५ कोटी रुपये मोजण्याची तयारी केली आहे. त्यामुळे हा करार अंदाजे ५७९ रुपये कोटींना झाला असल्याचे समोर येत आहे.**

### प्रायोजकासाठीचे सर्व विक्रम मोडीत

**अपोलो टायर्स व्यतिरिक्त, कॅनव्हा आणि जेके सिमेंट्सनेही आशिया कपच्या लिलावात भाग घेतला होता. यावेळी जेके सिमेंट्सने ४७७ कोटींची बोली लावली. तर, कॅनव्हाने ५४४ कोटींची बोली लावली. मात्र, बीसीसीआयचा अपोलो टायर्ससोबतचा करार ५७९ कोटींना अंतिम झाला. यापूर्वी, बीसीसीआय आणि ड्रीम ११ ने ३५८ कोटींचा तीन वर्षांचा करार केला होता. त्यामुळे अपोलो टायर्सने सर्व विक्रम मोडले असून भारतीय संघाला जर्सी प्रायोजकासाठीची ही सर्वात मोठी रक्कम ठरली आहे.**

## सुतारवाडीत खो-खो स्पर्धा संपन्न

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

सुएसोच्या द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी या विद्यालयाच्या मैदानामध्ये दि.१५ ते १६ सप्टेंबरदरम्यान तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये रोहा तालुक्यातील विविध शाळांनी सहभाग दर्शविला. या स्पर्धेचे उद्घाटन येरलचे सरपंच सुरेश जाधव व उपसरपंच कविता तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत मुलांचे ३८ संघ तर मुलींचे २६ संघ सहभागी झाले होते.

यावेळी स्कूल कमिटीचे अध्यक्ष दत्ताराम मंचेकर, येरळ तंटामुक्ती अध्यक्ष संजय मुंबरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चिंतामण दळवी, माजी तंटामुक्ती अध्यक्ष



माणिकराव सावंत, सदस्य राजेंद्र अडली, कर शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघ सुतारवाडीचे अध्यक्ष मनोहर साळवी, समन्वयक काणेकर, मुख्याध्यापक श्रीराम काळे, महेश बामूगडे, प्राचार्य भालेराव, माजी शिक्षक गायकवाड, सुतारवाडी हायस्कूलचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विविध शाळांतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेत १४ वर्षे मुलींच्या गटात प्रथम क्रमांक श्री रा.ग. पोटफोडे मास्तर विद्यालय खांब, द्वितीय क्रमांक एमपीएस एस इंग्लिश मीडियम कोलाड, तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक सानेगाव हायस्कूल व द्वितीय क्रमांक जिंदाल इंग्लिश मीडियम स्कूलने पटकावला आहे. १७ वर्ष मुलींच्या गटात प्रथम क्रमांक विरजोली हायस्कूल व द्वितीय क्रमांक श्री रा.ग. पोटफोडे मास्तर विद्यालय खांब, तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक सानेगाव हायस्कूल व द्वितीय क्रमांक सानेगाव आश्रम शाळेने पटकावला आहे. तसेच, १९ वर्षे मुलींच्या गटात प्रथम क्रमांक जिंदाल इंग्लिश स्कूल व द्वितीय क्रमांक मेंहदले हायस्कूल रोहा, तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक मेंदळे हायस्कूल व द्वितीय क्रमांक जूनियर कॉलेज कोलाड यांनी पटकावला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुतारवाडी हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव मोटे यांनी केले. तसेच, यशस्वी शाळांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## गोल्डन बॉयची अंतिम फेरीत धडक

**। टोकियो । वृत्तसंस्था ।**

भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा टोकियोमध्ये सुरू असलेल्या जागतिक मैदानी अजिंक्यपद स्पर्धेत जेतेपदाचा बचाव करण्यासाठी मैदानावर उतरला आहे. बुधवारी झालेल्या पात्रता स्पर्धेत पहिल्याच प्रयत्नात त्याने ८४.८५ मीटर भालाफेक करून अंतिम फेरीतील आपले स्थान पक्के केले. अंतिम फेरीत पात्रता निश्चित करण्यासाठी ८४.४० हे अंतर ठेवले गेले होते आणि नीरजने पहिल्याच प्रयत्नात ते पार केले. नीरजने २०२३ मध्ये बुडापेस्ट येथे सुवर्णपदक पटकावले होते.

जागतिक स्पर्धेत भालाफेक प्रकारात एकूण ३७ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे आणि त्यात 'अ' गटात १९ व 'ब' गटात १८ खेळाडूंचा समावेश होता. 'अ' गटात नीरजने पहिल्याच प्रयत्नात अंतिम फेरीची पात्रता पक्की केली. एकूण १२ खेळाडू अंतिम फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. नीरजच्या गटात भारताच्या सचिन यादवचाही समावेश आहे आणि त्याने दुसऱ्या प्रयत्नात ८३.६७ मीटर भाला फेकला आहे. या गटात जर्मनीच्या ज्युलियन वेबरने दुसऱ्या प्रयत्नात ८७.२१ मीटर लांब भाला फेक करून अंतिम फेरीत धडक मारली आहे.

## ऑस्ट्रेलियाकडून यजमान भारताची धुलाई

**। लखनऊ । वृत्तसंस्था ।**

भारत दौऱ्यावर आलेल्या ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने यजमानांच्या गोलंदाजांची धुलाई केली आहे. १९ वर्षीय सॅम कॉन्स्टासच्या शतकानंतर यष्टिरक्षक जोश फिलिप्पेने आक्रमक शतक झळकावले आहे. या दोन शतकांच्या जोरावर ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने पहिला डाव ६ बाद ५३२ धावांवर घोषित केला. तर, दुसऱ्या दिवसाच्या खेळात भारताने एक गडी गमावत ११६ धावा केल्या.



प्रथम फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलिया 'अ' संघाला सॅम कॉन्स्टास व कॅम्पबेल केलावे यांनी १९८ धावांची सलामी दिली. कॅम्पबेल ९७ चेंडूंत ८८ धावांवर बाद झाल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी फास आवळला होता. कर्णधार नॅथन मॅकस्वीनी (१) व ऑलिव्हर पीक (२) यांना त्यांनी गुंडाळले. परंतु, त्यानंतर कॉन्स्टान्स १४४ चेंडूंत १०९ धावा करून माघारी परतला. कूपर क़ॉनोली व लिएम स्कॉट यांनी पाचव्या बळीसाठी १०९ धावांची भागीदारी करून भारत 'अ' संघाची डोकेदुखी वाढवली. कॉनोली ८४ चेंडूंत ७० धावांवर, तर स्कॉट १२२ चेंडंत ८१ धावांवर बाद झाला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांना आशेचा किरण दिसत होता; परंतु, सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या जोशने ८७ चेंडूंत १२३ धावांची नाबाद खेळी केली. तसेच, झेव्हियर २४ चेंडूंत ३९ धावांवर नाबाद राहिला आणि ऑस्ट्रेलियाने पहिला डाव ६ बाद ५३२ धावांवर घोषित केला. हर्ष दुबेने सर्वाधिक ३ बळी घेतले; परंतु, त्याने २७ षटकांत १४१ धावा दिल्या. गूरनूर ब्रारने २ बळी घेतले, तर खलील अहमदने १ बळी घेतला.

## वेस्ट इंडीजचा भारत दौरा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

येत्या २ ते १४ ऑक्टोबरदरम्यान भारत विरुद्ध वेस्ट इंडीजयांच्यात २ कसोटी सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. अहमदाबाद आणि दिल्ली येथे हे सामने खेळवण्यात येणार असून त्यासाठी वेस्ट इंडीजच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात वेस्ट इंडीजचा धडाकेबाज फलंदाज शिवनारायण चंदरपॉलच्या मुलाचाही समावेश करण्यात आला आहे. याशिवाय आणखी दोन नव्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. द्विपक्षीय मालिकेसाठी वेस्ट इंडीजचा हा भारत दौरा तब्बल ७ वर्षांनी होता आहे. वेस्ट इंडीजसाठी ही मालिका जागतीक कसोट अजिंकदपाच्या नव्या चक्रातील पहिली मालिका असणार आहे. या संघात ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील संघाच्या तुलनेत तीन बदल करण्यात आले आहेत. तागेनारिन चंदरपॉल, ॲलिक अथानाझ तसेच डावखुरा फिरकी गोलंदाज खारी पियरे यांना संधी देण्यात आली आहे.

## बांगलादेशने अफगाणांना पाजले पाणी

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम चारमधील चुरस आणखी वाढली आहे. मंगळवारी (दि.१६) झालेल्या लढतीत बांगलादेशने बलाढ्य अफगाणिस्तानला पराभूत करून अंतिम चारमधील आशा कायम राखल्या आहेत. मात्र, बांगलादेशच्या या विजयाने 'ब' गटातील स्पर्धा रोमांचक वळणावर आली आहे. आतापर्यंत भारत हा एकमेव संघ अंतिम चारमध्ये पोहोचला असून उर्वरित तीन जागांसाठी पाच संघांना अजूनही संधी आहे.



बांगलादेशने मंगळवारी झालेल्या सामन्यात अफगाणिस्तानवर ८ धावांनी विजय मिळवला आहे. यावेळी सैफ हसन (३०) व तंझीद हसन (५२) या सलामीवीरांनी आक्रमक सुरुवात करून दिल्यानंतरही बांगलादेशला ५ बाद १५४ धावांपर्यंत जमल मारता आली. तोवहिद हृदोयने २६ धावांचे योगदान दिले. अफगाणिस्तानकडून राशीद खान व नूर अहमद यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना सेदीकुल्लाह अटल गोल्डन डकवर माघारी परतला. रहमनुल्लाह गुरबाज (३५) व अझमतुल्लाह ओमारजाई (३०) वगळल्यास अफगाणिस्तानच्या अन्य फलंदाजांनी निराश केले. त्यामुळे अफगाणिस्तानचा डाव १४६ धावांवर गुंडाळला गेला. यावेळी मुस्ताफिजूर रहमानने ३, तर नसूम अहमद, तस्कीन अहमद व रिशाद होसैन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

## वैशालीला ग्रँड स्विस किताब

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतावची बुद्धिबळपटू वैशाली रमेशबाबू हिने फिडे विमेन्स ग्रॅण्ड स्विस स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. या विजयासह तिने पुढील वर्षी होणाऱ्या फिडे विमेन्स कॅंडिडेट्स स्पर्धेचे तिकीटही मिळवले आहे. पुरुष विभागात हा किताब नेदरलँड्सच्या अनीश गिरी याने जिंकला. वैशालीने युक्रेनच्या मारिया मुजिचुकचा पराभव करून ७.५ गुणांसह संयुक्त आघाडी घेतली होती. त्यानंतर चीनच्या तान झोंगयीविरुद्ध ड्रॉ खेळून तिने किताबावर शिक्कामोर्तब केले. २४ वर्षीय वैशालीने सलग दुसऱ्यांदा फिडे विमेन्स ग्रॅण्ड स्विसचे विजेतेपद जिंकण्याचा पराक्रम केला आहे. वैशाली ही फिडे विमेन्स कॅंडिडेट्स २०२६ साठी पात्र ठरणारी तिसरी भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली आहे. याआधी दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांनी या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती.

## नांदगाव विद्यालयात कबड्डी स्पर्धा पार

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रीडा परिषद अलिबाग यांच्यावतीने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात तालुकास्तरीय पावसाळी कबड्डी क्रीडा स्पर्धा संत नामदेव महाविद्यालय नांदगाव येथे १५ व १६ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन नगरपंचायत पालीचे नगरसेवक सुमेध खैरे, सखाराम खैरे, शांताराम लहाने, दत्ताराम शिंदे, प्राचार्य बबन पालवे, ज्येष्ठ शिक्षक अशोक शिंदे, समुदाय आरोग्य अधिकारी आकाश वैध व क्रीडा शिक्षक आदी मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले.

या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुलांच्या १४ आणि



१९ वर्ष वयोगटात ग.बा. वडेर पालीने, तर १७ वर्षे वयोगट संत नामदेव महाविद्यालय नांदगावने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, मुलींच्या १४ वर्ष वयोगटात आश्रमशाळा चिवेने, तर १७ आणि १९ वर्षे वयोगटरत ग.बा. वडेर पालीने प्रथम क्रमांक पटकावला. या विजयी संघांना पारितोषिक स्व. रमाकांत धानुधरे यांच्या स्मरणार्थ सामाजिक कार्यकर्ते विजय धानुधरे यांच्यावतीने देण्यात आले.

### निवड समितीमध्ये दिग्गज क्रिकेटपटूंचा प्रवेश | आरपी सिंह, प्रज्ञान ओझाची नवीन भूमिका

## भारतीय संघाचे भवितव्य बदलणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

एकेकाळी भारतीय संघातील महत्त्वाचे खेळाडू मानले जाणारे आरपी सिंह आणि प्रज्ञान ओझा आता भारतीय क्रिकेटमध्ये नवीन भूमिका घेणार आहेत. हे दोघेही आता निवड समिती म्हणून भारतीय संघाला बळकट करण्यासाठी काम करणार आहेत. दोघेही अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील पुरुष वरिष्ठ निवड समितीचे नवीन सदस्य होऊ शकतात.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने गेल्या महिन्यात दोन राष्ट्रीय निवड समितीच्या पदांसाठी अर्ज मागवले होते. मिळालेल्या मसहितीनुसार, निवड समितीमध्ये कोणत्याही प्रमुख व्यक्तींनी रस दाखवला नाही. माजी भारतीय वेगवान गोलंदाज प्रवीण कुमारने



राष्ट्रीय निवड समितीसाठी अर्ज केला होता. त्याच्याशिवाय, उत्तर प्रदेशचा माजी वेगवान गोलंदाज आशिष विन्स्टन झैदी आणि हिमाचल प्रदेशचा शक्ती सिंह हे मध्य विभागातील इतर उमेदवार होते. भारतीय बोर्डाने संघाचे दोन निवृत्त निवडकर्ते, सुब्रतो बॅनर्जी (मध्य विभाग) आणि एस. शरथ (दक्षिण विभाग) यांना बदलण्यासाठी काही निकष निश्चित केले होते. बीसीसीआयच्या मते, ज्यांनी किमान ७ कसोटी सामने, ३० प्रथम श्रेणी सामने, १० एकदिवसीय सामने किंवा २० प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत तेच या पदांसाठी अर्ज करण्यास पात्र होते. अर्जदारांनी किमान ५ वर्षांपूर्वी खेळातून निवृत्ती घेतलेली असावी आणि एकूण ५ वर्षांसाठी बीसीसीआयच्या कोणत्याही क्रिकेट समितीचे सदस्य नसावेत.

आरपी सिंगने २००५ ते २०११ दरम्यान १४ कसोटी, ५८ एकदिवसीय आणि १० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याने एमएस धोनीच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेत भारतासाठी पहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता. तसेच, २००८ ते २०१३ दरम्यान प्रज्ञान ओझाने २४ कसोटी, १८ एकदिवसीय आणि ६ टी-२० सामने खेळले आहेत. कार्यपद्धतीनुसार, अशोक मल्होत्रा, जतिन परांजपे आणि सुलक्षणा नाईक यांचा समावेश असलेली क्रिकेट सल्लागार समिती (सीएसी) वरिष्ठ निवड समितीमधील दोन्ही पदांसाठी उमेदवारांची मुलाखत घेणार आहे. त्यानंतर सीएसीने निवडलेल्या उमेदवारांच्या नावांची बीसीसीआय अधिकाऱ्यांना शिफारस करणार आहे. त्यामुळे दोन्ही नवीन निवडकर्त्यांनी पुढील महिन्यात पदभार स्वीकारण्याची अपेक्षा वर्तविली जात आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)